CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

कोहलीची वादळी फलंदाजी, भुवनेश्वरचा भेदक मारा

## भारताचा अफगाणिस्तानवर १०१ धावांनी विजय

**दुबई** : विराट कोहलीच्या वादळी शतकानंतर भुवनेश्वरच्या भेदक माऱ्याच्या जोरावर भारताने आशिया चषकाचा शेवट गोड केला आहे. आशिया चषकातील अखेरच्या सामन्यात भारताने अफगाणिस्तानचा १०१ धावांनी पराभव केला. भारताने प्रथम फलंदाजी करताना २०१२ धावांचा डोंगर उभा केला होता. प्रत्युत्तरद अफगाणिस्थानचा संघ १११ धावांपर्यंतच पोहचला. विराट कोहलीने नाबाद १२२ धावा तर भुवनेश्वरने ४ षटकात ५ गडी बाद केले.

www.surajyadigital.com | शुक्रवार, दि. ९ सप्टेंबर २०२२ | वर्ष : २० वे | अंक : ३४१ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

# भीमा दुथडी; पाण्याखाली पंढरीचा पूल दगडी, उजनी तुडुंब, लागली हुडहुडी; धोकावली भीमथडी

**सुराज्य/पंढरपूर**

**पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या पावसामुळे जोरदार पावसामुळे जिल्ह्याची वरदायिनी असणारे उजनी धरण तुडुंब भरले असून भीमा दुथडी भरून वाहत आहे. पंढरीचा दगडीपूल आणि नदीपात्रातील मंदिरे पाण्याखाली गेली आहेत. त्यातच उजनीतून विसर्ग सुरू झाल्यामुळे भीमथडीला हुडहुडी लागली असून प्रशासनाने नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.**

### ६१ हजार क्युसेकचा विसर्ग

उजनी धरणात मोठ्या प्रमाणावर पाणी येत आहे. त्यामुळे धरणातून ६१६०० क्युसेक पाणी भीमा नदी पात्रात सोडण्यात येत आहे. सध्या पंढरपूर येथे ३२००० क्युसेक पाणी वाहत असून चंद्रभागा नदी दुथडी भरून वाहत आहे. त्यामुळे जुना दगडी पूल पाण्याखाली गेला आहे. तसेच चंद्रभागा नदीपात्रातील सर्व मंदिरे आणि समाध्या पाण्याखाली गेल्या आहेत.

### घोड धरणातील पाणी उजनीत

उजनी धरणातून गेल्या काही दिवसांपासून पाणी सोडले जात असले तरी मागील २४ तासात पाणलोट क्षेत्रात दमदार पावसाची हजेरी होती. उजनीवर ही ८७ मिलिमीटर पाऊस झाला. भीमा खोऱ्यातील घोड धरणातून २३ हजार क्युसेक पाणी सोडले जात असून ते थेट उजनीत येते. तसेच दौंडचा विसर्गही २० हजार क्युसेक इतका आहे. हे पाहता क्षमतेने ११० टक्के भरलेल्या उजनीतून पाणी सोडणे अपरिहार्य झाले आहे.

### नदीकाठाला सतर्कतेचा इशारा

उजनीत १२२.६० टीएमसी एकूण पाणीसाठा असून यातील उपयुक्त पाणी हे ५८.९४ टीएमसी इतके आहे. प्रकल्पातून दहिगाव, सीना माढा योजना, भीमा-सीना जोडकालवा, मुख्य कालवा यासह वीज निर्मितीसाठी पाणी सोडले जात आहे. उजनीच्या पाण्याने भीमा नदी दुथडी भरून वाहत असून पाणी पातळी वाढत आहे. यातच नदी परिसरात गेले काही दिवस पाऊस होत आहे. यामुळे नदीकाठी नागरिकांना प्रशासनाने सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

**सुराज्य**
सोलापूर

**उद्याचा अंक नाही**

अनंत चतुर्दशीनिमित्त सुराज्य कार्यालयास शुक्रवार दि.९ सप्टेंबर २०२२ रोजी सुट्टी असल्याने उद्या शनिवार दि. १० सप्टेंबर २०२२ चा अंक प्रकाशित होणार नाही, याची नोंद वाचक, विक्रेते, जाहिरातदार यांनी घ्यावी, ही विनंती.

-व्यवस्थापकीय संचालक

गेल्या काही दिवसांमध्ये भीमेच्या खोऱ्यात झालेल्या पावसामुळे उजनी धरण शंभर टक्के भरले. त्यातच गेल्या दोन दिवसांत पुन्हा पावसाने उजनीच्या पाणलोट क्षेत्रात जोरदार हजेरी लावल्यामुळे उजनीतील पाणी पातळी झपाट्याने वाढली. सध्यस्थितीला उजनी धरण ११० टक्के भरले आहे. त्यात पाणलोट क्षेत्रातील पाऊस थांबायचे नाव येत नाही. त्यामुळे उजनीतून भीमेच्या पात्रात पाणी सोडण्याशिवाय दुसरा पर्याय उरला नाही.

## बनावट खवा बनवण्याऱ्या कंदलगावातील दूध डेअरीवर धाड

### १ लाख ७० हजार रुपयांचा साठा जप्त; कारखाना सील

**सुराज्य/सोलापूर**

अन्न व औषध प्रशासनाने गुरूवारी दक्षिण सोलापुरातील कंदल गावातील चौधरी दूध डेअरीवर धाड घालत दीडशे किलो बनावट खव्यासह १ लाख ७० हजारांचा साठा जप्त केला. ही कारवाई अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त (अन्न) प्रदीपकुमार राऊत यांनी केली.

मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे दक्षिण सोलापुरातील कंदलगाव येथील हकमाराम चौधरी यांच्या मालकीच्या चौधरी दूध डेअरी या आस्थापनेवर सहाय्यक आयुक्त (अन्न) प्रदीपकुमार राऊत, अन्न सुरक्षा अधिकारी अस्मिता टोणपे यांनी धाड टाकली. याठिकाणी मदनराम पटेल यांच्याकडून कृत्रिमरीत्या खवा बनविण्याचे काम सुरू होते. खवा व इतर भेसळकारी अन्न पदार्थांचे नमुने ताब्यात घेऊन तपासणी केली असता खव्यामध्ये शरीरास हानिकारक घटक आढळून आले. त्यामुळे सर्व मुद्देमाल जप्त करत हा कारखाना सील केला. यामध्ये २७ हजार किमतींचा १५० किलो खवा, १८ हजार ९१४ रुपयांचे १०५ किलो पामोलिन तेल, ५७ हजार ६०० रुपयांची १६० किलो हिमालया कंपनीचे स्किम्ड मिल्क पावडर, २८ हजार ८०० रुपयांची ८० किलो साखर तसेच साखर (अपमिश्रक - ३०० किलो, किंमत रुपये - १० हजार पाचशे) वनस्पती (अपमिश्रक - १९५ किलो, किंमत रुपये- २६ हजार) असे एकूण किंमत रुपये १ लाख ६८ हजार ८१४ चा साठा जप्त करण्यात आला.

या कारखान्यास तात्काळ व्यवसाय बंद करण्याची नोटीस देण्यात आली आहे. नमुन्यांचे विश्लेषण अहवाल प्राप्त होताच अन्न सुरक्षा व मानके कायद्यानुसार पुढील योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल तसेच सर्व मिठाई उत्पादक व विक्रेत्यांनी अशा कृत्रिम खव्यापासून मिठाई बनवू नये, तसे आढळून आल्यास त्यांच्यावर अन्न सुरक्षा कायद्यानुसार कडक कारवाई केली जाईल, असा इशारा अन्न औषध प्रशासनाच्या वतीने दिला आहे.

## दयानंद कॉलेजच्या शिपायाने गळफास घेवून केली आत्महत्या

**मोहोळ** : सोलापूरच्या दयानंद कॉलेज मधील शिपायाने आपल्या गावी पाटकूल (ता. मोहोळ) येथे राहत्या घरी अज्ञात कारणावरून गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना गुरुवारी सकाळी उघडकीस आली आहे.

प्रतिक अनिल सवने (वय २८) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. प्रतिक सवने हा दयानंद कॉलेज सोलापूर या ठिकाणी शिपाई म्हणून काम करित होता तर त्याचे वडील भिमा सहकारी साखर कारखाना येथे हेल्पर म्हणून काम करतात. रात्री आई वडील यांच्यासोबत प्रतिकने जेवन केले.

रात्री साडे नऊ वाजण्याच्या सुमारास तो त्याच्या खोलीत जाऊन झोपला. गुरूवारी सकाळी सात वाजण्याच्या सुमारास त्याच्या वडीलांनी त्याच्या दाराची कडी वाजवून त्यास उठवण्याचा प्रयत्न केला परंतु त्याच्या कडून काही प्रतिसाद मिळाला नाही म्हणून शेजारच्या लोकांना बोलावून दरवाजा तोडला असता प्रतिकने लुगीच्या साहयाने पाय बांधलेले व वरच्या सराला साडीच्या साह्याने गळफास येतलेल्या अवस्थेत दिसला. कंबरेला चिठठी होती त्यास तातडीने सोडवून मोहोळ येथील ग्रामीण रुग्णालयात आणले असता डॉक्टरांनी मृत्यू झाल्याचे सांगीतले या घटनेचा तपास पी.एस.आय लोबू चव्हाण हे करत आहेत.

## विसर्जनाची सेल्फी 'सुराज्य'च्या अंकात...

**Go Green with Ecofriendly Ganesh** ही मोहीम घराघरात पोहोचली आणि अवघा गणेशोत्सव इकोफ्रेंडली बनला.
लाडक्या बाप्पाचे विसर्जन सुरु होईल ते अनंत चतुर्दशी पर्यंत!
आपल्या घरातील लाडक्या बाप्पाचे घराच्या दारात, अंगणात, टेरेसवर जेव्हा विसर्जन कराल तेव्हा या क्षणाची 'सेल्फी' घ्यायला विसरु नका!
ही सेल्फी सुराज्यला व्हॉटस्अप किंवा इमेलवर पाठवा!

**सोबत आपले नाव आणि पत्ता आवर्जुन द्या...**
**आपला हा सुंदर आठवणीचा सेल्फी सुराज्यच्या अंकात प्रसिद्ध होईल.**

WhatsApp
8975768353 | 8975768352 | 9011466100 | 8888818448
8975768349 | 7775956817

Email : timemarathi@gmail.com


**तिसरा डोळा**

– प्रकाश पोरे



बाप्पा, पुढच्या वर्षी आणखी चांगल्या गोष्टींची अपेक्षा करूया !!!

**कल्याण**
---

**मेन बाजार**
---

## डीजीसीएच्या अहवालाची प्रतीक्षा, चिमणीवर १५ सप्टेंबरला सुनावणी

**सुराज्य/सोलापूर**

सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या चिमणीबाबत नागरी विमान वाहतूक महासंचालकांचा (डीजीसीए) अहवाल अद्याप आलेला नाही. या कारणास्तव चिमणीबाबतची सुनावणी १५ सप्टेंबर रोजी ठेवण्यात आल्याचे आयुक्त पी. शिवशंकर यांनी सांगितले.

होटगी रोड विमानतळावरून नियमित विमानसेवा सुरू करण्यास सिद्धेश्वर कारखान्याची चिमणी अडथळा ठरत असल्याचा अहवाल डीजीसीएने दिला होता. या आधारावर महापालिकेने चिमणी पाडकामाची कारवाई हाती येतली होती. हे प्रकरण उच्च न्यायालयात गेल्यानंतर उच्च न्यायालयाने या प्रकरणात पुन्हा पाहणी करून अहवाल सादर करण्याचे आदेश डीजीसीएला दिले. डीजीसीएच्या अहवाल आल्यानंतर पालिकेने सुनावणी घेऊन अहवाल सादर करावा, असे सांगितले. डीजीसीएच्या पथकाने मागील महिन्यात कारखाना, विमानतळ परिसराची पाहणी केली. दरम्यान, महापालिकेत ७ सप्टेंबर रोजी सुनावणी होती. डीजीसीएचा अहवाल न आल्याने चिमणी प्रकरणावर १५ सप्टेंबरला सुनावणी घेण्यात येईल, असे आयुक्तांनी सांगितले. डीजीसीएच्या अहवालाच्या आधारे चिमणीचे भवितव्य ठरणार आहे.

CMYK

# स्मार्ट शाळांचे धोरण

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ५ सप्टेंबरला शिक्षक दिनी 'प्रधानमंत्री स्कुल्स फॉर रायझिंग इंडिया अर्थात पीएम२ श्री' या केंद्र सरकारच्या योजनेची घोषणा केली. या योजनेत देशभरातील १४ हजार ५०० शाळांचे अद्ययावतीकरण करण्यात येणार आहे. या निमित्ताने या योजनेत नेमका कशाचा समावेश आहे? शाळेत कोणत्या गोष्टींचा पुरवठा होणार? कोणत्या पायाभूत सुविधा वाढणार? केंद्र सरकारकडून किती निधी मिळणार? यासाठी कोणत्या शाळा पात्र असणार? ह्या बाबी पहाणे महत्वाचे ठरेल. या योजनेंतर्गत देशभरात अनेक नव्या शाळांची निर्मिती केली जाईल तसेच ज्या जुन्या शाळा आहेत त्यांचे अद्ययावतीकरण होणार आहे. या सर्व शाळा केंद्र सरकारच्या नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार तयार केल्या जाणार आहेत. या योजनेसाठी देशभरातून १४ हजार ५०० शाळांचा समावेश असेल. त्यात राज्य आणि केंद्रशासित प्रदेश दोन्हींचा समावेश असेल. या योजनेची पहिली घोषणा जूनमध्ये राष्ट्रीय शिक्षण धोरण परिषदेत गांधीनगर (गुजरात) येथे झाली होती. मोदींनी आपल्या भाषणांमध्ये दिलेल्या माहितीनुसार, या योजनेतील शाळांमध्ये शिक्षणाच्या आधुनिक पद्धतींचा समावेश केला जाईल. तेथे संशोधनावर भर दिला जाईल. विद्यार्थ्यांना गोष्टी शिकण्यासाठी सोयीस्कर शिकवण्याच्या पद्धती अवलंबल्या जातील. या शाळांमध्ये आधुनिक पायाभूत सुविधा आणि अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करण्यावरही भर दिला जाईल. स्मार्ट क्लासरुम आणि खेळावरही यात काम केले जाईल. या शाळांमध्ये प्रयोगशाळा, स्मार्टक्लास रूम, ग्रंथालय, खेळाचे साहित्य आणि कला वर्ग उपलब्ध करून देण्यावरही भर असेल. सर्वात महत्त्वाचे म्हणजे या शाळा पर्यावरणपूरक बनवण्यावर लक्ष केंद्रित केले जाणार आहे. यासाठी पाणी संवर्धन, कचरा पुनर्वापर, ऊर्जा-कार्यक्षम पायाभूत सुविधा इत्यादी गोष्टींचा अवलंब केला जाईल. पीएम श्री योजना केंद्र सरकारची असून या योजनेच्या अंमलबजावणीसाठी येणाऱ्या खर्चात केंद्र सरकार ६० टक्के भार उचलणार आहे. उर्वरित ४० टक्के खर्च राज्य सरकार किंवा केंद्रशासित प्रदेशांना उचलावा लागणार आहे. हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, जम्मू काश्मीर आणि ईशान्य भारतातील राज्यांमध्ये केंद्र सरकारचे योगदान ९० टक्क्यांपर्यंत असणार आहे. या योजनेशिवाय केंद्र सरकार देशातील केंद्रीय विद्यालय आणि नवोदय विद्यालयांना आधीपासून निधी पुरवते. या शाळा केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या अखत्यारित येतात. केंद्रीय शाळेत केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांच्या मुलांना प्रवेश मिळतो, तर नवोदय विद्यालयात ग्रामीण भागातील हुशार विद्यार्थ्यांना घडवले जाते. केंद्र सरकारने सप्टेंबर २०२१ मध्ये नवीन पोषण आहार योजना सुरू केली. या योजनेचे नाव प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना असे आहे. ही योजना सरकारी आणि खासगी अनुदानित शाळांमध्ये लागू आहे. याच योजनेंतर्गत देशातील पहिली ते आठवीच्या जवळपास ११ कोटी ८० लाख विद्यार्थ्यांना जेवण पुरवले जाते. याशिवाय केंद्र सरकारकडून विद्यार्थ्यांसाठी काही शिष्यवृत्ती योजनाही सुरू करण्यात आल्या आहेत. यात विद्यार्थिनींसाठी प्रगती शिष्यवृत्ती, आर्थिक आणि इतर मागास वर्गातील विद्यार्थ्यांसाठी पीएम यशस्वी योजनांचा समावेश आहे.मोदी यांनी नेहमीप्रमाणे एक नवी इव्हेंट देशापुढे आणली आहे.वास्तविक पाहाता ती चांगली आहे पण त्याची अंमलबजावणी कशी केली जाते? यावर या योजनेचे भवितव्य अवलंबून आहे. शाळा सुधारणार असतील तर देशासाठी ही एक चांगलीच बाब आहे. पण भाजप विरोधी पक्षांची जिथे सरकार आहे,तिथे या योजनेचा स्वीकार केला जातो का? हाही खरा प्रश्न आहे.शाळांच्या इमारती सुधारतील पण त्या शाळेतील मुलांची गुणवत्ता सुधारेल काय? असा प्रश्न पुढे आणला जाऊ शकतो.आज प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाच्या गुणवत्तेविषयी ओरड सरू असते.दहावी आणि बारावी परिक्षेतील टक्केवारी जेव्हा समोर येते तेव्हा ही गणवत्ता नव्हे,अशी टीका विचारवंतांमधून नेहमीच केली जाते.गुण नको तर गुणवत्ता हवी,असा विचारही मांडला जातो.शाळांच्या इमारतींमध्ये गुणवत्ता असेल पण विद्यार्थ्यांच्या बौद्धिक गुणवत्तेचे काय?शिक्षकांना आज नवीन काही नको असते.राष्ट्रीय कर्तव्यातील काम करण्यासही त्यांचा नेहमीच नकार असतो.पुस्तकी ज्ञानही व्यवस्थित दिले जात नाही. संस्काराचे शिक्षण शाळांमधून हद्दपार झाले आहे.शाळांच्या इमारती सजज्ज असतील पण ज्ञानवर्धित व संस्कारक्षम शिक्षणाचे काय? याचेही उत्तर मोदी सरकारकडून अपेक्षित आहे.

## सामाजिक

# शिदोरी

शिदोरी प्रामुख्याने दोन प्रकारची. एक म्हणजे जेवणाची. लांबच्या प्रवासात नेण्यासाठी जेवणाच्या शिदोरीतले पदार्थ पाण्याचा अंश कमी असलेले आणि जरा अधिक टिकणारे असावे लागतात म्हणजे पोळ्या, दशम्या, गुळाच्या/ सांज्याच्या पोळ्या, मिरच्यांचा ठेचा, सुक्या चटण्या, लोणची.. बटाट्याची सुकी भाजी, झुणका, प्रवासी पिठले, थापट वड्या, दही भातइ. दुसऱ्या प्रकारची शिदोरी म्हणजे फराळाची. त्या शिदोरीत भाजलेले शेंगदाणे, तिखट-मीठाच्या पुऱ्या, वेगवेगळ्या प्रकारचे पण खरपूस भाजलेल्या पिठांचे, शक्यतो पाकातले लाडू, उडिद, तांदूळ आणि हरभरा डाळीचे निपट्ट (चपट्या पुऱ्या), चिवडा, चकल्या, शेव, करंज्या असा दिवाळीसारखा फराळ. त्यात असतो.

आमच्या कोल्हापूरकडे सासरहून माहेरी नियालेल्या मुलींबरोबर, तिच्या माहेरच्या पै पाहुणे आणि शेजाऱ्यांसाठी लाडू/ करंज्या/केळीची शिदोरी पाठवायची पध्दत आहे. या शिदोरीवरून सासरच्या लोकांची दानत आणि आपल्या मुलीची त्यांच्याकडे असलेली पत जोखली जाते. अशी शिदोरी तिच्या माहेरूनही सासरी जाते.

आपण जेव्हा आपल्या घरी आलेल्या पाहुण्याला निरोप देतो, तेव्हाही त्यांच्याबरोबर आपण आवर्जून शिदोरी बांधून देतो. अशी शिदोरी आपण आपल्या लाडक्या गणपती बाप्पांनाही त्यांच्या विसर्जनाच्या दिवशी देतो. ही शिदोरी त्यांना प्रवासात खाण्यासाठी आणि कैलासातल्या सर्वांना इथल्या पदार्थांचा वानोळा म्हणूनही दिलेली असते. प्रत्येक ठिकाणी या शिदोरीतले पदार्थ वेगवेगळे असतात. पण सगळ्याच ठिकाणी बाप्पांबरोबर विशिष्ट पध्दतीने तयार केलेले दही पोहे' मात्र नक्की दिले जातात. यामागे एक लोककथा सांगितली जाते. पूर्वी म्हणे गणेशोत्सवानंतर श्रीगणेश जेव्हा कैलासात परत जात, तेव्हा त्यांचे पोट हमखास बिघडलेले असायचे. तसे तर त्यांची पार्वती माय त्यांना, पृथ्वीवरच्या प्रवासात जपून खाण्याचा सल्ला देत असेच. पण त्यांच्याच उत्सवासाठी पृथ्वीवर जाण्याचा, श्रीगणेशांना एवढा अमाप उत्साह असे की ते आईच्या सांगण्याकडे साफ दुर्लक्ष करत असत. त्यात त्यांना खाण्याची आत्यंतिक आवड आणि प्रेमळ भक्तांचा अनाठायी आग्रह यामुळे, उत्सव संपेपर्यंत म्हणजे चांगले दहा दिवस पोट तुडुंब भरेपर्यंत, ते यथेच्छ गोडधोड आणि तळणाचे पदार्थ खातमग जो परिणाम व्हायचा, तो निस्तरायला त्यांना आईच लागे. मग पोट दुखतेय म्हणून त्यांचे रडणे काय नाचणे कायनुसता थयथयाट असायचा. त्यात कार्तिकेय दादाचे चिडवणे पार्वती मातेला अगदी वैताग येई. अशावेळी शंकर महादेव मात्र नेहमीप्रमाणेच ध्यानालाच बसलेले असत. पण ते जरी ध्यानात असले तरी त्यांचे लक्ष मात्र घरात असे. गणेशांची रडारड ऐकून एकदा त्यांनी पार्वतीला सांगितले, गणेशाच्या भक्तांना निरोप द्या, त्याला हवे तितके खायला घाला, पण कैलासावर परत पाठवताना, त्याच्या हातावर, थोडे गोड दही ठेवा आणि बरोबर दही पोह्याची' शिदोरी द्या. दही पोहे! एवढे मोदक, खीर, लाडू, घारगे..भजे, वडे वगैरे खाल्ल्यावर दही पोहे!' हूं म्हणून गणेशांनी सोंड वाकडी करून नापसंती दर्शवली होती. पण महादेवांच्या डोळ्यांकडे पाहून त्यांनी मुकाट्याने ते मान्यही केले. खरे तर त्यानंतरच, गणेशोत्सवानंतरचा तो त्यांच्या पोटदुखीचा कार्यक्रम' म्हणे कायमचा संपुष्टात आला. यातली गंमत सोडून दिलीतरी दही आणि दही पोहेहे अजीर्ण पोटावर उत्तम औषध असतात. भवरोग वैद्य असलेले ईश्वर ते जाणत असणारच.

मात्र तेव्हापासूनच म्हणे विसर्जनाच्या वेळी गणेशांच्या हातावर इवलेसे पण गोड दही ठेवण्याची प्रथा सुरू झाली. या दह्यात मीठ, साखर घालत नाहीत. त्यावेळी गणपतींबरोबर दही पोहेही' देतात. त्यासाठी दगडी पोहे पाण्यात चांगले धुवून कोरडे करतात. मग एक वाटी धुतलेल्या पोह्यांना, चार चमचे दूध आणि अर्धा चमचा दही लावतात. त्यावर मीठ, साखर घालून त्या पोह्यांवर, तेलात मोहरी, जिरे, हिंग, कढीपत्ता, हिरवी मिरची किंवा खाराची मिरची घातलेली फोडणी घालतात. मग ते कोरडे दिसणारे पोहे केळीच्या पानात बांधतात आणि त्यांची पुरचुंडी बांधून तिचा दोरा गणेशांच्या हातात देतात. प्रवासात भूक लागली की तशा पोह्यात साधे पाणी घातले की एकदम चवदार दही पोहे तयार होतात. या पोह्यांमधल्या कार्बज्मुळे पोटही पटकन भरते. त्याचबरोबर त्यातल्या आयर्न आणि बी ग्रुप्सच्या व्हिटॅमिन्समुळे प्रवासाचा शीण होत नाही. त्यातल्या दह्यामधल्या प्रोबॉयॉटिक्समुळे', प्रवासात अद्वातद्वा खाणे झाले तरी पोटही बिघडत नाही.

पण श्रीगणेशांचे भक्त त्यांची फक्त पोह्यांवरच बोळवण करत नाहीत. त्याशिवाय कैलासावरही देण्यासाठीच्या शिदोरीसाठी बनवलेले पदार्थही एकसे एक असतात.

हे सर्व पदार्थ भौगोलिक स्थान आणि प्रत्येक कुटुंबातील पध्दती यानुसार वेगवेगळे असतात. त्या सगळ्या पदार्थात मला आवडतात त्या खानदेशातल्या तेलच्या'. त्यासाठी खपली गहू खमंग भाजतात आणि त्याचा रवा काढूनतो गुळाच्या दाटसर पाण्यात रात्रभर भिजवतात. त्या गुळाच्या पाण्यात किंचित मीठ, सूंठ, जिरे आणि वेलदोडेही घालतात. रात्रभर गूळाचे पाणी पिऊन तो रवा चांगला फुलतो. मग हाताला तूप लावून त्या रव्याचे सैलसर लाडू बांधतात. कणकेत थोडे बेसनाचे पीठ आणि कडकडीत मोहन आणि मीठ घालून घट्ट भिजवतात. दोन कणकेच्या गोळ्यांमध्ये तो सोजीचा लाडू ठेवून, त्याच्या पुऱ्या लाटून तळतात. या पुऱ्या चांगल्या फुगतात. यांचे वैशिष्ट्य म्हणजे शिळ्या तेलच्या' चवीला अधिक छान लागतात. काही ठिकाणी शेवखंड किंवा शेवखंडाचे लाडू करतात. बेसनाची जाड शेव तळून गुळाच्या पाकात घालतात. यासाठी शेव करताना पुरेसे मोहन घालणे आणि खमंग तळणे आवश्यक असते. गुळाच्या पाकातली शेव इतकी सुंदर लागते की कितीही खाल्ली आणि पोट भरले तरी मन भरत नाही. काही जणांकडे ही तळलेली शेव बारीक करतात आणि त्यात गूळ किंवा पीठी साखर घालून लाडू करतात. पुण्या-मुंबईकडे यावेळी वाटली डाळ, काही ठिकाणी लिंबाचा रस, सुके खोबरे घातलेली कच्ची आंब्याची डाळ करतात. तर कुठे वाटलेल्या हरभरा किंवा हिरव्या मुगाच्या डाळीचे किंवा बेसनाचे लाडू करतात. उत्तर कर्नाटकात डाळ्याचे आणि चुरमुऱ्याचे लाडू करतात. काही ठिकाणी ओले खोबरे चांगले कोरडे भाजून त्यात पीठी साखर मिसळतात आणि पांढऱ्या शुभ्र करंज्या करतात. काही ठिकाणी खोबरे, रवा आणि साखर घालून तळलेले मोदक करतात. कोकणातही काही ठिकाणी तुपात गुलाबीसर भाजलेल्या कणकेत पिठीसाखर मिसळून कणकेचे लाडू करतात. मालवण जवळच्या भागात यावेळी बोरे' करायची पध्दत आहे. कणकेत थोडेसे तांदळाचे पीठ घालून त्यात तीळ, जिरे, मीठ, सुके खोबरे भाजून घालतात आणि चिंच गुळाच्या पाण्यात ती कणिक भिजवून त्याचे छोटे बोराएवढे गोळे करून तळतात. हे गोळे अळूच्या पानात ठेवून त्याची पुरचुंडी केळीच्या सोपाने बांधतात. विसर्जनाच्या वेळी, गणपती बाप्पांच्या गळ्यात अशा बऱ्याच, शिदोऱ्यांच्या पुरचुंड्यांची माळ अडकवलेली असते. काही ठिकाणी कणिक आणि तांदळाच्या पीठाची उकड काढून छोट्या बरण्या करतात. त्यामध्ये हरभऱ्याची डाळ आणि भरपूर गूळ, सुका मेवा घातलेले खोबऱ्याचे सारण भरून, त्या बरण्या तळतात. कर्नाटक किनारपट्टीवरच्या गावात यावेळी अंबोडे' नावाची अतिशय चविष्ट अशी भजी करतात. हरभरा डाळ भिजवून, त्यामध्ये मिरची, आले, आणि (त्यात काही ठिकाणी त्यात मिरी, बडिशेप/ शेपूही घालतात) आणि कोथिंबीर घालून चपटी भजी थापून खरपूस तळतात. दक्षिण कोकणात, अळूच्या पानांच्या गाठोड्यात भात, काळ्या वाटाण्याचे सांबार आणि वडे असे ताजे जेवण बांधून बाप्पांच्या बरोबर देतात. कोकणातच काही ठिकाणी विसर्जनाच्या वेळी गणरायांबरोबर हरभरा आणि मूग डाळ, तांदूळ, नारळ, गूळ, कणिक, भाज्या असा कच्चा शिधाही बांधून देतात. काही कडक सोवळे ओवळे पाळणारे लोक, घरातले, शिजवलेले पदार्थ बाहेर खात नाहीत, ते लोक प्रवासाला जाताना कच्चा शिधा बरोबर घेऊन जातात आणि एखाद्या थांब्यावर चूल मांडून स्वैपाक करतात. ते लोक त्यांच्या देवांनाही तशीच शिदोरी देतात. काही वेळा त्यांच्या शिदोरीत तुपात भाजलेला कोरडा शिरा किंवा उप्पीटही असते. गरम पाणी घातले की पदार्थ खाण्यासाठी तयार होतात. काही ठिकाणी, देवांच्या बरोबर फक्त फळे बरोबर देतात.

दूरच्या प्रवासासाठी न्यायच्या शिदोर्यांमध्ये बहुधा हरभऱ्याच्या डाळीचे पदार्थ असतातच. पूर्वीच्या प्रवासामध्ये ते पदार्थ, तहान लाडू, भूक लाडूसारखे काम करत. कारण प्रवासात कधी कुठे.. पाणी, खाणे मिळेल याची तेव्हा शाश्वती नसायची. मानस सरोवर, हिंगलाज यासारख्या अनेक यात्रांमध्ये, त्या शिदोरीत कोणकोणते पदार्थ असावेत आणि कधी कोणत्या वेळी खावेत, अशा प्रकारचे अनेक नियम असतात. पण त्यातला महत्वाचा नियम म्हणजे, शिदोरीतल्या पदार्थांची देवाण घेवाण करायची नाही. पण अनेक संतचरित्रांमध्ये त्यांनी त्यांच्या शिदोरीतले पदार्थ सोबतच्या वाटसरूंना दिल्याचे उल्लेख असतात. अशा वेळी देणारा आणि घेणारा दोघेही कृतकृत्य होतात आणि माणुसकीचे बंध अधिक सघन होतात.

**–मंजुषा देशपांडे**

## टुडेज ब्लॉग

# ... तर मक्तेदारी संपुष्टात येईल

मराठी माणसाच्या न्याय्य हक्कासाठी शिवसेनाप्रमुखांनी स्थापन केलेल्या शिवसेनेच्या स्थापनेपासून दर वर्षी होणारा दसरा मेळावा ही शिवसेनेची शान आणि वैभव म्हणून ओळखले जाते. एक पक्ष, एक झेंडा आणि एक मैदान ही देशभर गेली छप्पन्न वर्षे शिवसेनेची प्रतिमा होती. देशात कोणत्याही राजकीय पक्षांचा नित्यनेमाने दर वर्षी एकाच मैदानावर मेळावा होतो आणि पक्षप्रमुखांचे त्यात खणखणीत भाषण होते, असे शिवसेनेखेरीज दुसरे उदाहरण सांगता येत नाही. आता दसरा मेळावा शिवाजी पार्क मैदानावर कोणी भरवायचा, याचा निर्णय मुंबई महापालिका ठरविणार आहे. शिवसेनेत उभी फूट पडेल, दोन तृतीयांश आमदार- खासदार बंड करतील, अशी कल्पना शिवसेनाप्रमुखांनीही कधी केली नव्हती. दि. १९ जून १९६६ रोजी प्रबोधनकारांच्या शिवाजी पार्क येथील निवासस्थानी बाळासाहेब ठाकरे, श्रीकांत ठाकरे, प्रबोधनकार ठाकरे यांच्या उपस्थितीत मोजक्या कार्यकर्त्यांच्या समोर सहदेव नाईक या कार्यकर्त्याने नारळ फोडला आणि छत्रपती शिवाजी महाराज की जय अशी घोषणा देत शिवसेनेचा शुभारंभ झाला. शिवसैनिकांचा पहिला दसरा मेळावा, रविवार, दि. ३० ऑक्टोबर १९६६ रोजी शिवाजी पार्क मैदानावर झाला. मराठी माणसाच्या न्याय्य हक्कासाठी लढणाऱ्या शिवसेनेचा भव्य मेळावा' असे निमंत्रण पत्रिकेवर म्हटले होते. आपला नम्र महाराष्ट्र सेवक, बाळ ठाकरे' असा निमंत्रणाच्या शेवटी उल्लेख होता.

शिवसेना नवी आहे, लोक जमले नाहीत, तर फज्जा उडेल, म्हणून हा मेळावा मैदानात न घेता एखाद्या सभागृहात घ्यावा, असे त्यांना काहींनी सुचवले. शिवसेनेचा पहिला मेळावा, तोही बंदिस्त हॉलमध्ये, शक्यच नाही...' असे बाळासाहेबांनी सुनावले. जे करायचे ते भव्य-दिव्य, उघड्या मैदानातच. जे काही होईल ते उघड्या मैदानात जगला दिसेल, असा आत्मविश्वास ठेऊन शिवाजी पार्क मैदानावर पहिला दसरा मेळावा झाला. या मेळाव्याला चार लाखांचा जनसमुदाय लोटला होता. तरुणाईचा उत्साह ओसंडून वाहत होता. या मेळाव्यात प्रबोधनकार भाषण करताना म्हणाले, आपल्याला सीमोल्लंघन करायचे आहे. ते करताना प्रत्येक ठिकाणी छत्रपतींचे नाव घेऊन, संकटात उडी टाकून अन्यायाचा फडशा पाडायचा, असा निश्चय केला पाहिजे?' प्रा. स. अ. रानडे, पद्माकर अधिकारी, बळवंत मंत्री, भालचंद्र ठाकूर, गोविंदराव शिर्के, अ‍ॅड. रामराव आदिक यांनी भाषणे केली. पहिल्या दसरा मेळाव्यात शिवसेनाप्रमुख म्हणाले - महाराष्ट्राला आज खरी गरज महाराष्ट्रवादाची आहे. आज मराठी माणूस जागा झाला आहे. यापुढे तो अन्याय सहन करणार नाही. राज्य सरकारला त्याची दखल घ्यावीच लागेल. जर मराठी माणूस जातीयवादी, प्रांतीयवादी, संकुचित वृत्तीचा असता, तर ही मुंबई कॉस्मोपॉलिटन झालीच नसती. शिवसेनेच्या दसरा मेळाव्याचे सर्वसामान्य मराठी माणसालाही आकर्षण राहिले आहे. शिवसेनाप्रमुखांच्या हयातीत ठाकरे शैलीतील झणझणीत भाषण मराठी माणसाला आवडायचे. विविध विषयांवरील शिवसेनेची भूमिका रोखठोकपणे मांडली जायची. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसवर शिवसेनाप्रमुख यथेच्छ तोंडसुख घ्यायचे. दसरा मेळाव्यातील भाषणांनी शिवसैनिकांमध्ये ऊर्जा निर्माण होत असे. आता तर शिवसेनेत दोन तृतीयांश फूट पडली, रोखठोक बोलणारे आहेत तरी कोण? दसरा मेळाव्यात कमांडर दत्ताजी साळवी, प्रमोद नवलकर, मनोहर जोशी, सुधीर जोशी, वामनराव महाडिक अशी एकसे एक तोफा डागणारी नेत्यांची टीम असायची, आता उद्धव गटाकडे घणाघाती वक्तृत्व असलेले उरलेत तरी कोण? जे तगडे नेते आहेत ते भाजपमध्ये किंवा एकनाथ शिंदे गटात गेले. हल्ली संजय राऊत यांचे उद्धव यांच्याअगोदर भाषण व्हायचे. पण तेही आता जेलमध्ये आहेत. सन २०१२ मध्ये दसरा मेळाव्यात प्रकृती अस्वास्थ्यामुळे शिवसेनाप्रमुख शिवाजी पार्कवर उपस्थित नव्हते. त्यांचे ऑनलाइन भाषण ऐकविण्यात आले. याच भाषणात त्यांनी आता उद्धव आणि आदित्यला सांभाळा, असे भावनिक आवाहन शिवसैनिकांना केले. २०१४ ते जून २०२२ शिवसेना महाराष्ट्रात सत्तेवर होती. महापालिकेतही सेनेची सत्ता होतीच. अडीच वर्षे मुख्यमंत्रीपदी शिवसेनाप्रमुखांचा पुत्र व मंत्रीपदावर नातू होता. या काळात शिवसैनिकांचे काय भले झाले, हे कोणी सांगू शकेल का? शिवसेनेच्या दोन्ही गटांना दसरा मेळावा का महत्त्वाचा आहे, मेळाव्यासाठी शिवाजी पार्क मैदानाच का हवे, शिवसेना आमचीच हा दावा ठोकण्यासाठी, दसरा मेळावा शक्तिप्रदर्शनासाठी आवश्यक आहे का? या वादात महापालिका दसरा मेळाव्यासाठी शिवाजी पार्क मैदान देईल का? या प्रश्नांनी काहूर माजले आहे.आता शिंदे गटाने दसरा मेळाव्यासाठी शिवाजी पार्क मैदान हायजॅक केले, तर ठाकरे गटाची मक्तेदारी संपुष्टात येईल.

**– डॉ. सुकृत खांडेकर**

## बोधकथा

# साधू आणि यक्ष



एक साधू तपश्चर्येस एका निर्जन स्थळी बसले होते. त्या ठिकाणी एका यक्षाचे वास्तव्य होते. या गोष्टीची साधूला कल्पना नव्हती. ते जेव्हा तेथे पोहोचले तेव्हा निर्जन स्थान पाहून त्यांनी तेथेच ध्यानधारणा सुरु केली. त्या वेळी यक्ष तेथे नव्हता. रात्री जेव्हा यक्ष तेथे आला तेव्हा आपल्या जागेवर दुस-यास व्यक्तीला पाहून त्याला राग आला. यक्षाने मग हत्तीचे रूप घेऊन त्यांना भीती दाखविण्याचा प्रयत्न केला. परंतु ते ध्यानस्थ असल्याने त्यांच्यावर याचा काहीच परिणाम झाला नाही. मग यक्षाने वेगवेगळी रूपे घेऊन साधूला घाबरविण्याचा प्रयत्न केला. कधी तो वाघ, सिंह, तरस, कोल्हा अशा जंगली प्राण्यांची रूपे घेतली तरी साधूच्या ध्यानात काहीच खंड पडेना. शेवटी त्याने विषारी सापाचे रूप धारण करून त्यांना दंश केला तरीही त्यांच्यावर याचा काहीच परिणाम दिसेना. इतक्या प्रयत्नानंतरही साधूवर कोणताही परिणाम न झाल्याने यक्ष झालेल्या श्रमाने थकून सर्परूपातच विश्रांती घेऊ लागला. थोड्याच वेळात साधूंची समाधी अवस्था पूर्ण झाली व ते जागे झाले व त्यांची नजर सर्परूपी यक्षावर पडली. त्या कृपादृष्टीने सापाच्या अंगातील विष अमृत बनले. यक्ष साधूंना शरण गेला व त्याने त्यांना आदरपूर्वक वंदन केले.

**तात्पर्य – एकाग्रता, स्नेह आणि प्रेमभावनेने कोणावरही विजय प्राप्त करता येतो.**

## जन्म हा अखेरचा

# परकायस्थल - १



त्याची बुद्धीदेखील उत्तम विचारांचाच अंगीकार करते. ज्ञानी पुरुष मायेच्या पलीकडे गेलेला असतो. त्याने सच्चिदानंदरूप अशा आत्म्याला जाणलेले असते, तो सच्चिदानंदरूपच झालेला असतो, म्हणून त्याचे शरीर आत्म्याइतकेच पवित्र असते.

शरीर स्वभावत: अपवित्र असते असे शास्त्रे सांगतात. परंतु ते सतत आत्म्याच्या संपर्कात असल्यामुळे त्याच्यात पावित्र्य दृग्गोचर होते. आपण व्यवहारात पाहतो की नख, केस, रक्त यांचा शरीराशी संबंध सुटला तर ते अपवित्र मानले जातात. जी वस्त्रे आपण दिवसभर अंगावर घालतो ती दुसऱ्या दिवशी स्नान करण्याआधी उतरवून ठेवतो. स्नान केल्यावर त्या वस्त्रांना आपण स्पर्शदेखील करत माही. असे का? वस्त्रे तर आपलीच आहेत, ती आपणच अंगावर घातली होती मग त्यांना अपवित्र का मानायचे? तर त्यांचा शरीराशी संबंध सुटला म्हणून, जोवर ती शरीराशी जडलेली होती तोवर ती पवित्र होती. त्याप्रमाणे शरीर मूलतः अपवित्र असले तरी त्याचा आत्म्याशी संबंध असल्यामुळे ते पवित्र असते आणि आत्म्याशी संबंध असेपर्यंत ते पवित्र राहते. शरीरातून आत्मा एकदा निघून गेला की शरीर अपवित्र, अस्पर्श होते.

**(क्रमशः) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

## जनमानस

# सामूहिक सेवा फलदायी

परमेश्वराच्या सेवेची महत्त्वाची अट अशी आहे की फक्त स्वत:साठी सेवा न करता सामूहिक सहभावनेने सर्वकल्याणाची, सर्वहितांची कास धरून सेवा केल्यास परमेश्वराची कृपा शीघ्र लाभते. सर्वांसाठी केलेल्या सेवेत आपले कल्याण सहज सामावलेले असते. भक्तांच्या मुखी सरस्वती वसते, त्यास आयुरारोग्य, ऐश्वर्य, संतती, विमल कीर्ती मिळते. सर्व विद्यांचे सारही त्यास गवसते, अशी कल्पतरू चिंतामणी परमेश्वरभक्ती निर्मोही सदाचरणाचे, संस्कारपूर्ण जगण्याचे आदर्श समाजात निर्माण करते. जेणेकरून भावी पिढ्यांवर सहजपणे सुसंस्कार होतात म्हणून मानवास परमेश्वर भक्तीचा अधिकार सहजपणे लाभला आहे.भगवान श्री स्वामी समर्थ महाराज विश्वातील समस्त मुमुक्षूंना पारमार्थिक वैभव देण्यासाठी लीला करीत आहेत. श्री स्वामी समर्थ महाराज ऐश्वर्यदानाने व अनुभवरहित कोऱ्या ज्ञानाने प्रसन्न होत नाहीत. बडोद्याच्या यशवंतराव सरदारांनी महाराज श्री स्वामींना खूष करण्यासाठी स्वर्णालंकारांची ताटे नजराणा म्हणून जेव्हा प्रथम भेटीस समोर ठेवली, तेव्हा महाराजांचा क्रोध अनावर झाला. त्या धनाकडे त्यांनी ढुंकूनही पाहिले नाही. तसेच, विष्णुबुवांच्या कोऱ्या ज्ञानाची मिजास स्वप्नदृष्टान्ताने स्वामींनी एका क्षणात उतरवली.

श्री स्वामी समर्थांना पाखंडी भक्ती, कपट, देखावा, अप्रामाणिकपणा अजिबात चालत नाही. स्वामीभक्ती पुनर्जन्माच्या पुण्याईने प्रारब्धाने मिळते; पण ती टिकवणे, वाढवणे त्याचा ध्यास लागणे, ही खऱ्या सेवेकऱ्याची कसोटी. भगवान श्री स्वामींनी समाजहित व राष्ट्रकल्याण यांची भक्तीशी सांगड घातलेली आहे. सूक्ष्म चैतन्यरूपात श्री स्वामी समर्थ महाराज सर्वांच्या हृदयात सर्वांच्या विवेकात, बुद्धीत सदैव विराजमान आहेत. माणसाच्या अंतरंगातील अक्कलकोट हेच आहे. श्री स्वामींची सेवाभक्ती स्वामीसुतासारखी तल्लीन, एकात्म व बाळाप्पासारखी विवेकी असावी; तरच आयुष्याचे सार्थक होईल, असा संदेश श्री स्वामी चरित्र सारामृतातून मिळतो. तो ध्यानी, मनी, वचनी एकरूप होण्यासाठी रोज या ग्रंथाचे क्रमशः तीन अध्याय व जास्तीत जास्त जप अशी नित्यसेवा प्रत्येक सेवेकऱ्यास दिली आहे. ज्याची एकनिष्ठ सेवा, चिंतन, स्वामीमयता असेल त्याला सर्व प्रकारची सुखे श्री स्वामी समर्थ महाराज देतात. तेच व्यंकटेश माधव आहेत. तेच कुलस्वामिनी कुलदेवताची प्रसन्नकृपा करणारे आहेत. बसाप्पा तेलीला त्यांनी ऐहिक, पारमार्थिक दोन्ही बाजूंनी साधक बनवले; परंतु बसाप्पाला पहिला लाभ पारमार्थिक ज्ञानाचा झाला नंतर ऐहिक सुखांचा हे विसरू नये.

**–आण्णासाहेब मोरे**

# ओंकार गणेशा

*। पितांबरधरं देवं शंखचक्रगदाधरम् ।*

*। अलंकृत समुद्रस्थं विश्वरूपम् विचिंतये।।*

दहा दिवसांच्या सोहळ्यानंतर महागणपतीचा निर्वाण दिन म्हणजे भक्तांच्या हृदयाला भेदणारी अशी अवक्त्य रेषा आहे. अनेक गुणांनी सदैव भक्तांना मोहित करणारा असा देव गणेश आज आपला निरोप घेत आहे. त्याने निरोप जरी घेतला तरी, तो आपल्या जवळच बुद्धी रूपाने रहात असतो.हे मात्र आपण विसरून चालणार नाही.

तो आनंद आहे. तो अनंत आहे. तो निर्गुण निराकार आहे. तो हाहाकार आहे. तो स्वाहाकारही आहे. विश्वातील प्रत्येक सजीव आणि निर्जीव गोष्टींवरती त्याचीच सत्ता आहे. तोच परब्रम्ह, तोच सृष्टी कर्ता आणि तोच विनाशाचे कारण आहे. तोच दिग्विजयी आहे. तोच कारण मात्रे अपयशही आहे. या सृष्टीला नवसंजीवनी देणारी शक्ती म्हणजेच देव गजानन. उत्पत्ती- स्थिती- आणि लय या तिन्ही गोष्टी ज्यात सामावलेल्या आहेत ,तो परमात्मा देव गजानन आहे .

पालनकर्ता हाच देव गजानन आहे.संहार कर्ताही तोच आहे.

लहानांपासून थोरांपर्यंत आणि गरीबांपासून श्रीमंतांपर्यंता सर्वच जण याचीच भक्ती करताना दिसतात. याच्याकडे कोणताच दंभ नाही . भेदाभेद नाही हा, अद्वैत आहे. द्वैताचा भाव जेथे संपतो ते तत्त्व म्हणजे श्री गणेश आहे.

आकाश मंडलातील समस्थ तारका याच्याच लीला आहेत. अखंड पृथ्वीला प्राणवायू पुरविणारा वार आहे. याच्याच तो इशाऱ्यावर चालतो. पंचतत्वातही गणपती विराट स्वरूपाचा आहे. जन्माला येणारा प्रत्येक जीव हा त्याचीच प्रेरणा आहे. सतत बुद्धी रूपाने मनुष्याच्या शरीरामध्ये वास करणाऱ्या या गणेशाला आज आपण निर्गुण निराकार स्वरूपात पाहतो. त्याची मोहक पार्थिव मूर्ती आपल्याला भावते. तो जर आपल्या समोर प्रत्यक्ष उभा राहिला, तर त्याचे तेज आपल्या डोळ्यांना दिपवून टाकणारे आहे. कोटी सूर्याच्या पलीकडे त्याची कांती सबंध चराचर व्यापून टाकते. चौंसष्ट योगिनी, अष्टदिक्पाल, चौदा भूवनांचे अधिपती, पालन कर्ते विष्णू, संहार कर्ते भगवान शंकर आणि सृष्टीची निर्माण करणारे ब्रह्मदेव याच्या आधिन आहेत.ते याच्याच पासून निर्माण झाले आहेत. हा अनेक रूपात भक्तांना सदैव अभय देता झाला. हाच श्रीकृष्ण आहे, हाच राम आहे. वराहा पासून ते होणाऱ्या कल्की पर्यंत हाच व्यापून उरलेला आहे.

*द्युतारंभ चाकुरूत स्वं राज्यं प्राप्नुयातत्।*

*द्यूतेनैव जिता:सर्वे पांडवा वीत कल्मषा:।।*

पांडवांचे कौरवांनी कपाट युक्तीने राज्य हरण केले, तेव्हा पांडव द्रौपदीसह अरण्यवास करत होते. तेव्हाही हाच गजानन श्रीकृष्ण परमात्मा रूपाने पांडवांचे रक्षण करण्याकरता अनंत रुपी झाला. त्यानेच पांडवांकडून अनंत व्रताचे अनुष्ठान करून घेतले आणि पूर्वजन्मीच्या पापापासून मुक्ती देऊन, त्यांचे दारिद्र्य दुःख नष्ट केले.

हाच प्रेरणा आहे. प्रतिभा ही हाच आहे. चौसष्ट कलांचा अधिपती देव गजानन आहे . याच्या पासूनच कवी कुळाचाही उगम उद्धार होतो. प्रत्येक ग्रंथाच्या आरंभीही हाच स्थीत आहे.सुरुवातीलाच याचीच स्तुती केली. जाते शिवशंकर यांचा पुत्र, पार्वतीचा नंदन आणि विष्णूचा अवतार समजला जाणारा हाच देव गजानन आहे. कलियुगामध्ये पृथ्वीवर अष्टदिक्पालांचे कार्य करणारा हाच देव गजानन आहे. त्याचे अनेक रूपे जरी असली तरी तो विराट रूपामध्ये या पृथ्वीला आपल्या स्वरूपामध्ये धारण करतो. हा च नदी आहे, हाच समुद्र आहे.

हा सुंदर आहे कुरूपही हाच आहे. समुद्रमंथनातून निघालेले विषही हाच आहे. आणि ते प्राशन करून जगाच्या कल्याणासाठी तेच विष आपल्या कंठा मध्ये धारण करणारा शिवशंकर ही हाच आहे.

यानेच हजार कमळे विष्णू अवतार घेऊन भगवान शंकरांना वाहिली, आणि भगवान शंकरांकडून सुदर्शन चक्र धारण केले. सबंध पृथ्वी आपल्यामध्येच धारण केलेला एकमेव देव म्हणजे देव गजानन. अशा अनंताला अनंत नमस्कार..

**– विठ्ठल जोशी (वैरागकर) ९४२३५३५४७१**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# दुधनी नाल्यावरील सर्व अतिक्रमणे हटवा : आ. कल्याणशेट्टी

✔ सुराज्य/अक्कलकोट

पूर्वा नक्षत्राच्या पावसामुळे मंगळवारी संध्याकाळी तालुक्यातील दुधनीमध्ये ढगफुटी झाली. यामुळे दुधनी शहरातील अनेक घरामध्ये पाणी शिरल्याने अनेकांच्या घर आणि संसार उपड्यावर पडले. या संदर्भात आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी गुरुवारी दुधनी नगर परिषदेत अधिकाऱ्यांची बैठक घेतली. या बैठकीस तहसीलदार बाळासाहेब सिरसट, अक्कलकोट दक्षिण पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक प्रदीप काळे, दुधनी न पा कार्यालयीन अधीक्षक चिदानंद कोळी यांच्या सह अक्कलकोट तालुका भाजपा अध्यक्ष मोतीराम राठोड, माजी नगराध्यक्ष भीमाशंकर इंगळे उपस्थित होते.

यावेळी अनेक नागरिकांनी दुधनी शहरातील नाल्यावरील अतिक्रमणामुळेच पाणी गावात शिरले असे तक्रार केली. यावर आमदार कल्याणशेट्टी यांनी पक्षापाती न करता नगर पालिकेच्या हद्दीतील सर्व अतिक्रमणे तातडीने हटवून पाणी जाण्याचा मार्ग मोकळा करून घ्या, अशी सक्त सूचना कर्मचारी व अधिकाऱ्यांना दिले. आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी गुरुवारी दुधनी शहरात झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी आले होते. मात्र त्याचवेळी पावसाने पुन्हा एकदा जोरदार हजेरी लावली. त्यामुळे आमदार कल्याणशेट्टी यांनी पुन्हा शनिवारी दुपारी दुधनी ला येऊन संपूर्ण गावातील नुकसानीची पाहणी करणार असल्याचे सांगितले. यावेळी भीमाशंकर अल्लापुर, कांतू धनशेट्टी, सिध्दाराम टक्कळकी, दौलत हौदे, बसवराज हौदे, हणमंत कलशेट्टीसह दुधनीतील नागरिक आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## माजी गृहराज्यमंत्री म्हेत्रेंकडून नुकसानीची पाहणी

अक्कलकोट : माजी गृहराज्यमंत्री सिध्दराम म्हेत्रे यांनी बुधवारी सायंकाळी उपविभागीय अधिकारी सोलापुर क्र. २चे प्रांताधिकारी सुमित शिंदे, तहसीलदार बाळासाहेब सिरसट, दुधनी नगर परिषदेचे मुख्याधिकारी आतिष वाळुंज, मैंदर्गी न. पा. चे मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे यांच्यासमवेत घरोघरी आणि बाजार पेठेतील व्यापाऱ्यांच्या दुकानात प्रत्यक्ष जावून पाहणी केली. व त्यांना धीर देत नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी कटिबध्द असल्याचे सांगितले. यावेळी व्यापारी असोशिएशनचे अध्यक्ष सुभाष परमशेट्टी, गुलाबसाब खैराट, लक्ष्मीपुत्र हबशी, चांदसाब नाकेदार, रामचंद्र गद्दी, गुरु हबशी आणि इतर कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी मुसळधार पावसामुळे दुधनी शहरातील छोट्या-मोठ्या व्यापाऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे, तरी त्यांना शासनाने त्वरित नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणीचे निवेदन शांभवी फौंडेशनच्या अध्यक्षा वैशालीताई शंकरराव म्हेत्रे यांनी प्रांताधिकारी सुमित शिंदे, तहसीलदार बाळासाहेब सिरसट यांच्याकडे लेखी निवेदनद्वारे केले. यावेळी शांभवी फौंडेशनचे महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अतिवृष्टी संदर्भात तहसील कार्यालयात बैठक

✔ सुराज्य/अक्कलकोट : तालुक्यात झालेल्या अतिवृष्टी संदर्भात प्रांताधिकारी यांच्या सुचनेप्रमाणे येथील तहसील कार्यालयात तहसिलदार बाळासाहेब सिरसट यांच्या अध्यक्षतेखाली तालुक्यातील विभागप्रमुखांची बैठक गुरूवारी सकाळी पार पडली.

तहसिलदार सिरसट यांनी संयुक्त पंचनामा व उपाययोजना बाबत सुचना दिल्या. मुख्याधिकारी यांनी नगरपालिका हद्दीतील गटार, नाले स्वच्छ करून घेण्याबाबत सुचना दिल्या. जंतुनाशक व कीटकनाशक बाबत सुचना दिलेल्या आहेत. पाणी स्वच्छ मिळण्याबाबत सुचना दिल्या. रस्त्याचे व पुलचे ऑडिट करण्याबाबत पीडब्ल्यु अभियंता यांना सुचना दिल्या. किणीवाडी रस्ता अतिक्रमण बाबत सुचना दिल्या.

> पीएम किसान योजनेसाठी काम सुरू आहे. तालुक्यात ५३१५५ खातेदारांची यादी मिळाली आहे. प्रत्येक तलाठी यांच्या कडुन यादी येऊन तपासुन यादी अपलोड करण्याचे काम सुरु आहे. अपलोड होण्यातही अडचणी येत आहेत. तलाठ्यांना बैठकीत सुचना दिल्या.
> – बाळासाहेब सिरसट, तहसीलदार

या बैठकीला अक्कलकोट चे मुख्याधिकारी सचिन पाटील, मैंदर्गी मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे, पशु वैद्यकिय अधिकारी डॉ. दिनेश मुरूमकर, दुधनी न.पा. चे कार्यालयीन अधीक्षक चिदानंद कोळी, वन विभागाचे कांबळे यांच्या सह सर्व विभागाचे विभागप्रमुख उपस्थित होते. गणेश उत्सव बंदोबस्तामुळे पोलीस कर्मचारी, अधिकारी तसेच परगांवी प्रशासकीय कामामुळे दुधनीचे मुख्याधिकारी आतिष वाळुंज व गटविकास अधिकारी उपस्थित नव्हते. सविस्तर आढावा बैठक मंगळवारी परत येणार असल्याची माहिती तहसीलदार बाळासाहेब सिरसट यांनी दिली.

## फॅबटेक कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य 'बेस्ट प्रिन्सिपल ऑफ दी इयर' ने सन्मानित

✔ सुराज्य/नाझरे : सांगोला येथील फॅबटेक टेक्निकल कॅम्पसमधील, फॅबटेक कॉलेज ऑफ फार्मसी या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय बैस यांना इंटरनॅशनल असोसिएशन ऑफ रिसर्च अँड डेव्हलपड ऑरगॅनिझेशन, गाझियाबाद व चेरन कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग करूर, चेन्नई यांच्या संयुक्त विद्यमाने या वर्षीचा 'बेस्ट प्रिंसिपल ऑफ दी इयर २०२२' ने सन्मानित करण्यात आले आहे. डॉ. एस के बैस यांना एकूण ३२ वर्षाचा टिचिंगचा अनुभव असून आत्तापर्यंत त्यांनी ४२ रिसर्च पेपर्स, ६ रिव्हिव्ह आर्टिकल, ९ रिसर्च पब्लिकेशन इन स्कोपस इंडेक्सइड जर्नल्स, ४ पोस्ट पी एचडी पब्लिकेशन, तसेच त्यांच्या मार्गदर्शनाखाली एम फार्मसीच्या १४ विद्यार्थ्यांनी शिक्षण पूर्ण केले आहे. ५ विद्यार्थी त्यांच्या मार्गदर्शनाखाली पी एचडी करीत आहेत. त्यांची ५ पुस्तके प्रकाशित आहेत, १ पेटंट फाईल, १ स्टार्टप नोंदणी, ५ पोस्टर प्रेसेंटेशन, आत्तापर्यंत ४० ट्रेनिंग अटेंड केले आहेत. हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल संस्थेचे चेअरमन भाऊसाहेब रुपनर, मॅनेजिंग डायरेक्टर अमित रुपनर, संस्थेचे कार्यकारी संचालक दिनेश रुपनर, यांनी प्राचार्य डॉ. संजय बैस यांचे अभिनंदन केले.

## कस्तुरबाई एज्युकेशनच्या बी.एड. परीक्षेत प्रतिमा ठाकूर प्रथम

✔ सुराज्य/सोलापूर : कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन सोलापूर येथील बी. एड. द्वितीय वर्षाचा चतुर्थ सत्राचा निकाल नुकताच जाहीर झाला. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्याकडून घेण्यात आलेल्या बी. एड् परीक्षेत कु. प्रतिमा राजकीरण ठाकूर या विद्यार्थीनीने ८०.००% गुण मिळवून महाविद्यालयात प्रथम येण्याचा मान मिळवला तर कु. पूजा स्वामी हिने ७९. ८२ % गुण मिळवून द्वितीय तर पल्लवी स्वामी या विध्यार्तीनीने ७९. ५५% गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळवला. तसेच ५० पैकी ४३ विध्यार्थी विशेष प्रविण्या सह उत्तीर्ण आहेत तर ७ विध्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण आहेत. या यशामुळे एस. ए. पी. डी. जैन पाठशाळा व वालचंद शिक्षण समूहाचे सचिव डॉ. रणजित गांधी व विश्वस्त यांच्याकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## माढा तालुक्यात दमदार पाऊस; वीज पडून म्हैस दगावली

✔ सुराज्य/कुर्डूवाडी : माढा तालुक्यात सर्वत्र पावसाने चार वाजण्याच्या सुमारास दमदार हजेरी लावली. वंदाच्या पावसाळ्यातील हा तालुक्यात व कुर्डूवाडी परिसरात पडलेला सर्वात मोठा पाऊस असल्याचे चर्चीले जात आहे. म्हैसगाव येथील विट्ठल शुगर्स कारखाना परिसरात शेतात बांधलेल्या गणेश हरिदास इथापे यांच्या म्हशीच्या अंगावर वीज पडल्याने जागीच मृत्यु झाला.

म्हैशीचा मृत्यु झाल्याने इथापे यांचे १ लाख पंचवीस हजाराचे नुकसान झाले आहे. मागिल दोन दिवसाखालीच गणेश इथापे यांना मृत्यु पडलेली म्हैस ही एका व्यक्तीने सव्वालाखाला मागितली होती. प्रशासनाकडुन पिडीत गणेश इथापे यांनी याची भरपाई द्यावी अशी मागणी केली आहे.

कुर्डूवाडी शहरात देखील बायपास परिसरात भोसरे हद्दीत बंद पडलेल्या टोल नाक्याजवळ एका घरावर वीज पडली यात कोणतीही जिवीत हानी झाली नाही.

## ग्रंथालयाच्या अनुदानात दुप्पट वाढ करण्याची मागणी

✔ सुराज्य/सोलापूर

राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील हे २९ ऑगस्ट रोजी सोलापूर दौऱ्यावर आले असता महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी संघटनेचे पुणे विभागाचे अध्यक्ष सदाशिव बेडगे व शिष्टमंडळानी त्यांची भेट घेतली. राज्यातील ग्रंथालयाच्या अनुदानात दुप्पट वाढ झाली पाहिजे याविषयीचे लेखी निवेदन देण्यात आले.

२५ जून २०१९ रोजी तत्कालीन वित्तमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी ६०% अनुदानाची अधिवेशनामध्ये घोषणा केली होती पण त्याचा शासन निर्णय झालेला नसल्यामुळे तसेच सन २०१२ पासून ग्रंथालयाच्या अनुदानात वाढ झाली नसल्यामुळे नुकतीच पावसाळी अधिवेशनात राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी ६०%अनुदान वाढीची घोषणा केली व त्याचा शासन निर्णय लवकरात लवकर काढावा यासाठी चंद्रकांत दादा पाटील यांचा शाल व नॅकपीन बुके देऊन सत्कार करण्यात आला.

सध्या दिवसेंदिवस वाढणाऱ्या महागाईमुळे पुस्तकांच्या किंमती, पेपरच्या किंमती, मासिकाच्या किंमती, इमारत भाडे वाढल्यामुळे अनुदानात दुप्पट वाढ करणे गरजेचे आहे. राज्यातील १२१४५ ग्रंथालयात २१६१५ ग्रंथालय कर्मचारी यांना तुटपुंज्या वेतनावर काम करावे लागत असल्यामुळे कमीत कमी त्यांना किमान वेतन मिळावे यासाठी ग्रंथालयाच्या अनुदानात दुप्पट वाढ करण्यात यावी तसेचवाढीव अनुदान सह सन २०२२-२०२३ या वर्षातील पहिल्या हप्त्याचे ५२% उर्वरित अनुदान लवकर वितरीत करण्यात यावे असेही सदाशिव बेडगे यावेळी म्हणाले राज्यातील काही ग्रंथालय कर्मचारी आणि आत्महत्या केल्या असून त्यांच्या कुटुंबीयांना शासनाने भरीव मदत द्यावी असेही यावेळी सांगण्यात आले तसेच राज्यातील ग्रंथालय कर्मचारी यांना विमा हॉस्पिटल मधून शासकीय योजनेचा लाभ मिळावा याविषयी त्यांच्याबरोबर चर्चा केली जे ग्रंथालय भाड्याच्या जागेत आहेत त्यांना शासनाच्या आरक्षण जागेतील जागा उपलब्ध करून देण्यात यावी याविषयी सांगण्यात आले. यावेळी उपाध्यक्ष धोंडीराम जेवूरकर सिध्दाराम हलकुडे अरिहंत रत्नपारखे वसंत धोत्रे जगदीश गिडवीर आदी उपस्थित होते.

# ए. डी. जोशी ज्युनियर कॉलेजचे नीट परीक्षेत यश



✔ सुराज्य/सोलापूर : ए. डी. जोशी ज्युनियर कॉलेजने नीट २०२२ परीक्षेत यावर्षीत यश संपादन केले. कॉलेजमधून परीक्षेस एकूण १८० विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. एकूण प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांपैकी ५५० च्या वर ०६ विद्यार्थी, ५०० च्या वर १० विद्यार्थी आणि ४०० च्या वर १७ विद्यार्थी आहेत.

त्यापैकी सावंत समर्थ याने ६३९ गुण प्राप्त करून प्रथम क्रमांक मिळविला. खरादी अब्दुरेहमान याने ६१० गुण प्राप्त करून द्वितीय क्रमांक मिळविला. पाठक आशिर्वाद याने ५९९ गुण प्राप्त करून तृतीय, पोळ सौरभ याने ५८९ गुण प्राप्त करून चतुर्थ तर शेख म. जुनैद याने ५७३ गुण प्राप्त करून पाचवा क्रमांक मिळविला. या सर्व विद्यार्थ्यांचे त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री ए. डी. जोशी, सचिव अमोल जोशी, सायली जोशी, प्राचार्य प्रविण देशपांडे यांनी अभिनंदन केले.

## अलकनंदा जोशी जुनिअर कॉलेजचे यश

✔ सुराज्य/सोलापूर : कै.सौ. अलकनंदा जोशी जुनिअर कॉलेजचे नीट २०२२ परीक्षेतील यशस्वी कामगिरी केली. या परीक्षेत पोडे सेजल या विद्यार्थिनीने ६२२ गुण प्राप्त करून प्रथम क्रमांक पटकवला तर झरोळे साक्षी या विद्यार्थिनीने ४५३ गुण प्राप्त करून द्वितीय क्रमांक मिळविला.

या सर्व विद्यार्थ्यांचे त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक प्रा. ए. डी. जोशी, अध्यक्ष लक्ष्मणराव ढोबळे, अमोल जोशी, सायली जोशी, प्राचार्य ज्योती शिवदे व सर्व प्राध्यापक वृंद यांनी अभिनंदन केले.

# शिवरायांची शासन व्यवस्था ही जगातील सर्वोत्तम : बागल

✔ सुराज्य/कुर्डूवाडी

ढाल आणि तलवार याच्या पलीकडे जाऊन छत्रपती शिवरायांचा अभ्यास करणे गरजेचे आहे. शिवरायांच्या काळात त्यांनी राबवलेले शासन हे जगातील सर्वोत्तम शासन होते, म्हणूनच ते जनतेला आपले स्वराज्य वाटत होते, असे प्रतिपादन कन्हेरगाव येथे श्री गणेश उत्सवानिमित्त आयोजित व्याख्यानात संभाजी ब्रिगेडचे प्रवक्ते शिवव्याख्याते हर्षल बागल यांनी बोलताना केले.

ते म्हणाले की, एकविसाव्या शतकामध्ये देखील विज्ञानाने प्रगती केली असताना अनेक देशांच्या नौका समुद्रात तळाशी गेल्या. पण हिंदुस्तानच्या धर्तीवर एकमेव असा राजा शिवछत्रपती आहे की ज्यांच्या स्वराज्यातील आरमारातील एकही नौका, एकही जहाज समुद्रात बुडाली म्हणून इतिहासाच्या पाठीवर नोंद नाही. राज्यातील आरमार व्यवस्था ही जगातील सर्वोत्तम व्यवस्था होती. छत्रपती शिवाजी महाराजांनी जेवढे गडकोट किल्ले बांधले त्यातल्या एकाही गडकोट किल्ल्याचा सत्यनारायण यातला नाही. किंवा महापूजेचा प्रसाद दिला नाही. हा शिवरायांचा वैज्ञानिक दृष्टिकोन होता. तर शिवरायांच्या काळात कृषी व्यवस्था ही शेतकऱ्यांना आपली वाटणारी स्वतःची वाटणारी व्यवस्था होती. जगातली पहिली कर्जमाफी, पहिला सारा माफ हा छत्रपती शिवरायांनी केला याची इतिहासामध्ये प्रखर नोंद आढळते.

यावेळी माजी पोलीस उपनिरीक्षक किसन खोचरे, माजी उपसरपंच धनंजय मोरे, उपसरपंच दीपक डोके, सोसायटीचे माजी चेअरमन नागेश मोरे, ह. भ. प. विष्णु महाराज डोके, ग्रामपंचायत सदस्य सोमनाथ कदम, शिवाजी भरगंडे, जालिंदर केदार, चांगदेव भरगंडे, प्रभाकर डोके, गणेश खोचरे, संजय पाटील, उत्रेश्वर केदार, नागनाथ केदार, संजय डोके, अध्यक्ष विकास टिंगरे, उपाध्यक्ष अजय केदार, राजेंद्र केदार, बिभिषण काशीद, प्रकाश टिंगरे, गणेश टिंगरे, गणेश पवार, धनाजी पवार, गोविंद साखरे, आकाश आगलावे, गजानन डोके, संतोष कांबळे, विशाल पवार, अण्णा डोके, बबलू आगलावे, सौरभ राऊत, गणेश सुतार, आयुष सुतार, संतोष धोत्रे, सुरज शिंदे, सचिन पोळ, राजेंद्र शिंदे, बाळु जगताप, काका खोचरे, तानाजी पाटील, भैरवनाथ धुमाळ आदी उपस्थित होते.

### शिवरायांच्या पाऊलखुणा आजही आढळतात

ज्या रेल्वे स्टेशनवर मोदींनी चहा विकला ते रेल्वे स्टेशन अद्याप पन्नास वर्षांमध्ये सापडले नाही पण पावणे चारशे वर्षांपूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांनी बांधलेल्या गडकोट किल्ल्यांवरती शौचालय सापडली विविध प्रकारचे बांधकाम सापडले रायगडच्या उत्खननात तब्बल ३०० प्रकारचे वाडे सापडले राणी महल सापडला विविध वस्तू उजेडात येत आहेत याच्यावरूनच छत्रपती शिवाजी महाराजांनी अवघ्या पन्नास वर्षाच्या कारकिर्दीत स्वराज्याचा विस्तार अहद तंजावर ते तहद पेशावर इथपर्यंत केला होता. आजच्या तरुणाईला माझी विनंती आहे शिवरायांना अभिप्रेत असलेला अहद असलेल्या तहत कॅनडा असा नोकरी आणि व्यवसायाच्या निमित्ताने आपण प्रवास करूया हाच खरा शिवरायांच्या विचारांचा जागर म्हणता येईल, असेही बागल म्हणाले.

आशिर्वाद

सहकार महर्षी गणपतराव साठे

स्व.विलासरावजी देशमुख

माढा तालुक्याचे युवक नेते,
सोलापूर जिल्हा युवक काँग्रेसचे
माजी अध्यक्ष
मा.श्री.
दादासाहेब साठे
यांना वाढदिवसाच्या मन:पूर्वक
हार्दिक शुभेच्छा..!

मार्गदर्शक
माजी आमदार

मा.ॲड.धनाजीराव साठे

कर्तव्यदक्ष नगराध्यक्षा

मा.ॲड.मिनलताई साठे

उमलते नेतृत्व

मा.वेदांत(भैय्यासाहेब)साठे

शुभेच्छुक
■ साठे गल्ली गणेश तरुण मंडळ, माढा
■ माळी गल्ली गणेश तरुण मंडळ, माढा

Black

# मातोश्री लक्ष्मी शुगर गाळपासाठी सज्ज : म्हेत्रे

## कारखान्याचा बॉयलर अग्नीप्रदीपन सोहळा

✔ सुराज्य/अक्कलकोट

अक्कलकोट तालुक्यात यावर्षी पाऊस मोठ्या प्रमाणात झाला आहे. या पार्श्वभूमीवर मातोश्री लक्ष्मी शुगर ऊस गाळपासाठी सज्ज असून कारखान्यावरील सर्व यंत्रणाही कार्यान्वित करण्यात आल्याची माहिती चेअरमन सिध्दाराम म्हेत्रे यांनी दिली.

रुददेवाडी (ता. अक्कलकोट) येथील मातोश्री लक्ष्मी शुगर कारखान्याचा दहावा बॉयलर अग्नी प्रदीपन सोहळा गुरुवारी मोठ्या उत्साहात पार पडला. त्यावेळी ते बोलत होते. पुढे बोलताना म्हेत्रे म्हणाले, गेल्या वर्षीही कारखान्याला ऊस यालून शेतकऱ्यांनी सहकार्य केले. शेतकऱ्यांचे ऊस बिले वेळेत टाकण्याचा प्रयत्न केला. यावर्षीही शेतकऱ्यांचे बिल तात्काळ जमा करण्याचा प्रयत्न आमचा राहणार आहे. तालुक्यात पाऊस मोठ्या प्रमाणात झाल्याने उसाचे क्षेत्र वाढले आहे याचा विचार करून जास्तीत जास्त गाळप करण्याचा आमचा प्रयत्न आहे. अक्कलकोट तालुक्यात कुरनूर धरण व भिमा नदीचा काठचा परिसर तडवळ भाग आणि तलाव क्षेत्रातील गावात उसाचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त ऊस कारखान्यास देऊन सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. कारखान्यातील विभागवार सर्वच पातळीवर वाहन, तोडणी, यंत्रसामग्रीची तयारी चांगली केली असल्याचे म्हेत्रे यांनी यावेळी सांगितले. प्रारंभी होम हवन आणि विधिवत पूजा करण्यात आली. त्यानंतर म्हेत्रे यांच्या हस्ते बॉयलर अग्नी प्रदीपन करण्यात आले. यावेळी युवा नेत्या शीतलताई म्हेत्रे, एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर बाळासाहेब कुटे, जनरल मॅनेजर आर. के. गदादे, चीफ इंजिनियर एन. एन. बिराजदार, चीफ केमिस्ट एम. एस माळशेट्टी, गुरुनाथ लोहार, केन मॅनेजर के. एल. होसूरे, डेप्युटी केन मॅनेजर

एस. एस गुरव, एम. डी शिरसे, विश्वनाथ हडलगी यांच्यासह सर्व खाते प्रमुख, उपखाते प्रमुख, कर्मचारी, नेते मंडळी व परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### यंदा ९ लाख मेट्रिक टन गाळपाचे उद्दिष्ट

यावर्षी कारखान्याने ९ लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट ठेवले आहे. गेल्या वर्षी शेतकऱ्यांच्या चांगल्या प्रतिसादामुळे ५ लाख २७ मेट्रिक टनापर्यंत गाळप झाले होते. शेतकऱ्यांना वेळेत बिल आणि जास्तीत जास्त गाळप करण्याचा प्रयत्न राहील.

**– सिध्दाराम म्हेत्रे,** चेअरमन, मातोश्री लक्ष्मी शुगर रुद्देवाडी.

# भौतिक गोष्टींपेक्षा छंद, कलेतून मिळणारा आनंद निर्भेळ : स्वामी

## जि.प. रांगोळी स्पर्धेचे बक्षीस वितरण थाटात

## निवडणूक आयोग व यशदाने घेतली दखल

✔ सुराज्य/सोलापूर

कलियुगात भौतिक गोष्टींना फार महत्त्व आले आहे. भौतिक गोष्टींमधून मिळणाऱ्या आनंदापेक्षा छंद, कला जपायला हवी. छंदातून मिळणारा आनंद हा निर्भेळ असतो. म्हणूनच जि. प. मध्ये रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सण उत्सव साजरे करण्यातून सकारात्मकता वाढीस लागते. कला, संस्कृती, छंद आपल्यात सकारात्मकता निर्माण करतात आणि आपण लक्ष देत नाही आणि त्यामुळे आपण फार मोठ्या आनंदाला पारखे होतो, असे मत मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी व्यक्त केले.

सोलापूर जिल्हा परिषद व जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांची पतसंस्था क्रमांक १ यांच्या संयुक्त विद्यमाने राजीव गांधी

प्रशासकीय गतिमानता अभियान, स्पर्धा, आरोग्य शिबीर व गणेशोत्सवाच्या निमित्ताने व्याख्यानमाला आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. ७ सप्टेंबर रोजी महिला कर्मचाऱ्यांसाठी रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात पारितोषिक वितरण समारंभ मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते झाला, याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे म्हणाले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंचल पाटील आणि पतसंस्था संचालक मंडळाने खूप चांगला कार्यक्रम घेतला. दररोजच्या त्यांच्या कामातून वेळ काढत महिला कर्मचाऱ्यांना आनंद दिला. पारितोषिक मिळणे गौण आहे. परंतु या निमित्ताने मिळालेला आनंद महत्वाचा आहे.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंचल पाटील म्हणाल्या, या उपक्रमाची माहिती समजल्यानंतर निवडणूक आयोग व यशदाने रांगोळी स्पर्धेची छायाचित्रे पाठवून द्या म्हणून निरोप दिला. यशदा त्यांच्या प्रशिक्षण सत्रावेळी आपल्या रांगोळी स्पर्धेची छायाचित्रांचे पोस्टर लावणार आहेत. त्यामुळे हा आमच्या महिला कर्मचाऱ्यांच्या कष्ट व कौशल्याचा गौरव झाला आहे. आमच्या महिला कर्मचाऱ्यांचे यानिमित्ताने राज्यभर कौतुक होणार याचा खरा आनंद आहे. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रशासन चंचल पाटील, कार्यकारी अभियंता पंडित भोसले, कृषी विकास अधिकारी विवेक कुंभार, कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी, सुनील कटकधोंड, पतसंस्था क्रमांक १ चे चेअरमन हरीबा सपताळे, संचालक अनिल जगताप, तज्ञ संचालक डॉ. एस. पी. माने, श्रीशैल्य देशमुख यांच्यासह कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमासाठी सचिव दत्तात्रय देशपांडे, सुभाष काळे, अशोक पवार, नितीन येमुल, जगदेवी अजनाळकर आदींनी परिश्रम येतले.

### रांगोळी स्पर्धेचा निकाल

* **प्रथम क्रमांक** : कृषी विभाग : आझादी का अमृत महोत्सव रांगोळी. * **द्वितीय क्रमांक विभागून : १) पंचायत समिती दक्षिण सोलापूर व शिक्षण विभाग प्राथमिक** – बेटी बचाव बेटी पढाओ व माझी शाळा सुंदर शाळा रांगोळी. * **तृतीय क्रमांक विभागून १) अर्थ व ग्रामीण पाणीपुरवठा** – हर घर तिरंगा व २) हर घर जल रांगोळी * **उत्तेजनार्थ पारितोषिके विभागून : १) पंचायत समिती उत्तर सोलापूर** – महाराष्ट्राची शान पैठणीचा मान. **२) समाज कल्याण** – सायकल बँक रांगोळी. **३) सामान्य प्रशासन विभाग** – बेटी बचाव बेटी पढाओ रांगोळी आणि **४) ग्रामपंचायत विभाग** – माझी वसुंधरा रांगोळी.

## महावितरणच्या कर्मचाऱ्यास मारहाण; दोघांना एक वर्ष कारावासाची शिक्षा

✔ सुराज्य/सोलापूर

महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांना साडेदहा वर्षांपूर्वी नांदेड जिल्हयातील बोळसा येथे मारहाण करणाऱ्या दोघांना भोकर येथील जिल्हा न्या. वाय. एम. एच. खरादी यांनी एक वर्ष कारावास आणि प्रत्येकी दोन हजार रुपये रोख दंडांची शिक्षा ठोठावली आहे.

४ फेब्रुवारी २०१२ रोजी महावितरणच्या नांदेड मंडळांतर्गत येणाऱ्या उमरी तालुक्यातील बोळसा येथे देवीची यात्रा होती. त्यानिमित्ताने वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी महावितरण कंपनीचे तंत्रज्ञ पांडुरंग दत्ताराम मोरे आणि त्यांचे सहकारी कार्यरत होते. याप्रसंगी डीपी मध्ये फ्युज टाकत असताना राघोबा वामनराव जगदंबे आणि लक्ष्मण भुजंग शिंदे हे दोघे त्या ठिकाणी आले आणि तंत्रज्ञ पांडुरंग दत्तराव मोरे यांना

तुमच्यामुळेच लाईट गेली असे म्हणत शिवीगाळ करत लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. त्याचबरोबर सरकारी कामात अडथळा निर्माण केल्या प्रकरणी गुन्हा दाखल झाला होता. या प्रकराची सुनावणी पुर्ण होऊन शिक्षा झाली आहे. या खटल्यात सरकार पक्षाची बाजू सरकारी वकील एस. टी. लाठकर तसेच रणजित देशमुख यांनी मांडली.

# शेतकऱ्यांचे थकीत २२ कोटी आर्यन शुगरला देण्याचे आदेश

✔ सुराज्य/सोलापूर : महाराष्ट्र जनहित शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रभाकर भैय्या देशमुख यांच्या लढ्याला अखेर यश आले आहे. प्रादेशिक सहसंचालक (साखर) विभागाने बार्शी येथील आर्यन शुगर कारखान्याला शेतकऱ्यांचे थकीत २२ कोटी ५० लाख रूपये देण्याचे आदेश दिले आहेत. पैसे न दिल्यास कारवाई करण्याचा इशाराही देण्यात आला आहे, अशी माहिती प्रभाकर देशमुख यांनी दिली. बार्शी तालुक्यातील खामगाव येथील आर्यन शुगरने २०१४-१५ पासून ते आतापर्यंत शेकडो शेतकऱ्यांचे ऊस वाहतूक भाडे, ट्रक मालकाचे भाड्यासह थकीत रक्कम २२ कोटी ५० लाख रूपये दिले नाही, याबाबत तक्रार केली होती. ही रक्कम आर्यन कारखाना विकत येतलेल्या बजरंग सोनवणे यांनी द्यावी, अशी मागणी केली होती. पैसे न दिल्यास कारखान्यात उसाची मोळी टाकू देणार असा इशारा दिला होता. अखेर याची दखल येत सहसंचालक (साखर) विभागाने बार्शी येथील आर्यन शुगर कारखान्याला थकीत २२ कोटी ५० लाख रूपये देण्याचे आदेश दिले आहेत.

## भाजीपाल्यांच्या दरात घसरण

कृषी उत्पन्न बाजार समितीकडून गुरूवार, ८ सप्टेंबर रोजी मिळालेल्या माहितीनुसार कारली, कोबी, गवार, काकडी, फ्लॉवर, लसूण, चाकवत, हिरवी मिरची, कांदा, बटाटा, शिराळी दोडका, शेपू, पालक आदी भाजीपाल्यांचे दर प्रतिक्विंटल १०० ते हजार रूपयेने कमी झाले. तर भेंडी, लिंबू, मेथी भाजी, तांदूळ, टोमॅटो आर्दीचे दर स्थिर राहिले.

### सोलापूर बाजारभाव

| शेतमाल | कमीत कमी दर (क्विं. ) | जास्तीत जास्त दर (क्विं. ) | सर्वसाधारण दर |
|---|---|---|---|
| सफरचंद | ५, ००० | ८, ५०० | ६, ००० |
| कारली | ६०० | २, ५०० | १, ५०० |
| वांगी | ५०० | २, ००० | १, ००० |
| कोबी | ४०० | १, ००० | ७०० |
| ढोवळी मिरची | ५०० | १, ५०० | १, ००० |
| गाजर | २, ५०० | ४, ००० | ३, ००० |
| गवार | २, ००० | ४, ००० | ३, ००० |
| कोथिंबीर | ३०० | १, ००० | ५०० |
| काकडी | १, ००० | २, ५०० | १, ५०० |
| फ्लॉवर | ५६० | १, ६०० | ८०० |
| लसूण | १, १०० | ३, ८०० | १, ५०० |
| घेवडा | १, ००० | ४, ००० | ३, ००० |
| हिरवी मिरची | १, ५०० | ३, ००० | २, ००० |
| अंबाडी भाजी | ५०० | ५०० | ५०० |
| कांदा पात | ५०० | ५०० | ५०० |
| बटाटा | ८०० | २, २०० | १, ९०० |
| लिंबू | २, ००० | ५, ७५० | ४, ००० |
| तांदूळ | ३, ००५ | ६, ३०० | ३, ७२५ |
| दोडका | ५०० | २, ००० | १, ००० |
| शेपू | १०० | ५०० | ३०० |
| ज्वारी | १, ९५० | २, ६३० | २, ४५५ |
| सोयाबिन | ५, ०७५ | ५, ०७५ | ५, ०७५ |
| पालक | १०० | ६०० | ३०० |
| टोमॅटो | २०० | १, ५०० | ६०० |
| कलिंगड | ३०० | ४, ००० | ३, ५०० |

# कमतरता हीच तुमची ताकत बनवा : डॉ. कोहोक

✔ सुराज्य/अक्कलकोट

कोणत्याही जर्जर आजार झाल्यास जिद्द ठेवा, कष्ट करा, कमतरता हीच तुमची ताकत बनविल्यास अशक्य आजारातूनही तुम्ही प्रत्येक क्षेत्रात भरारी येऊ शकता असे प्रतिपादन कॅन्सरग्रस्त जागतिक सौंदर्यवती डॉ. नमिता कोहोक यांनी केले.

विवेकानंद प्रतिष्ठानच्यावतीने गणेशोत्सव व्याख्यानमालेचे पाचवे पुष्प गुंफताना सोनेरी मुकूटाचा काटेरी प्रवास' या विषयावर स्वत:च्या जीवनात आलेले प्रसंग कथन केले. व्याख्यानमालेचे प्रारंभ श्री स्वामी समर्थ व श्री गणेश प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलनाने सुवर्णा साखरे, वैशाली लोकापुरे, सोनल जाजु, अनुजा तोतला, रुपाली वाले, ॲड. हुल्ले, उषा हंचाटे, वसुंधरा सराटे, रुपाली येणगुरे, श्रीमती स्वामी आदी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. नमिता कोहोक ह्या पहिल्या भारतीय कॅन्सर सर्वायवर ज्यांनी आपल्या देशाचा तिरंगा अमेरिकेत चौथ्यांदा फडकाविला. मिसेस ग्लोबल युनायटेड एलिट लिफेटाईम क्वीनचा किताब मिळवून नुकत्याच जुलै महिन्यात अमेरिकेत झालेल्या सोहळ्यात हा सन्मान त्यांना प्रदान करण्यात आला. ४८ देशांच्या स्पर्धकांमधून त्यांची ही निवड करण्यात आली. याआधी त्यांना मिसेस ग्लोबल युनायटेड लाईफटाईम क्वीन (अमेरिका), मिसेस ग्लोबल युनायटेड २०१७ (अमेरिका), मिसेस इंटरनॅशनल वर्ल्डवाईड क्वीन २०१५ हाँगकाँग किताब त्यांच्या नावावर केले आहेत. मिसेस सुर्यदत्ता २०२२ (पुणे), सामाजिक व शैक्षकण कार्यासाठी डॉ. नमिता कोहोक यांना आतापर्यंत ६३ इंटरनॅशनल व राष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. त्यांचे व्याख्याने जगभरात ५८० हून अधिक झाले आहेत. त्या पहिल्या भारतीय कॅन्सर सर्वायवर आहेत.

यावेळी दिनेश पटेल, गजानन पाटील, विजय तडकलकर, जितेंद्र जाजु, महावीर येणगुरे, गणेश अंबुरे, संतोष बारंगुळे, धानप्पा हत्तुरे, प्रशांत लोकापुरे, बाबुराव रामदे, सिध्दाराम पाटील, महेश शिंदे, शिवानंद खुबा, निनाद शहा, दिपक जरीपटके यांच्यासह शेकडो नागरिक व महिला श्रोतेगण उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्तावना खंडेराव याटगे, पाहुण्याचे परिचय श्रीमती स्वामी तर आभार विलास कोरे यांनी मानले.

## नीट परीक्षेतील यशाबद्दल नन्ना याचे स्वामींकडून कौतुक

✔ सुराज्य/सोलापूर : वैद्यकीय अभ्यासक्रम प्रवेश परीक्षेचा (नीट) निकाल जाहीर झाला आहे. या परिक्षेत आरोग्य विभागातील औषध निर्माण अधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या दिनेश नन्ना यांचा मुलगा पवन याने दैदिप्यमान यश मिळविले आहे. या यशाबद्दल सीईओ दिलीप स्वामी यांनी पवन नन्ना याचे कौतुक केले.

पवन नन्ना याने ७२० पैकी ६२९ गुण मिळवत यश प्राप्त केले आहे. त्याचा ऑल इंडिया रँक १ हजार ४१२ आहे. पुढे सैन्य दलाच्या वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश येणार असल्याचे पवन नन्ना याने सांगितले. पवनचे दहावीपर्यंत शिक्षण राज मेमोरियल स्कूल व महाविद्यालयीन शिक्षण संगमेश्वर महाविद्यालयात झाले आहे. पवनने मिळवलेल्या या यशाबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी शाल व रोप देवून पवन याचा सत्कार करून कौतुक केले. यावेळी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंचल पाटील, कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी, पंडित भोसले, सुनील कटकधोंड, विवेक लिंगराज, श्रीधर कलशेट्टी, डॉ. एस पी. माने आदी उपस्थित होते.

# शिक्षक जाधव यांचा सन्मान

✔ सुराज्य/वेळापूर : मळोली येथे ५ सप्टेंबर शिक्षक दिनानिमित्त जिल्हा परिषद शाळा मलोळी येथील उपक्रमशील शिक्षक नानासाहेब जाधव यांचा सन्मान माळशिरस पं. स. सदस्य रणजितसिंह जाधव यांच्या हस्ते करण्यात आला.

शिवप्रेमी युवक गणेशोत्सव मंडळ यांच्या वतीने मळोली गावचे माजी सरपंच गणेशराव पाटील व राजेंद्र कदम यांचाही या वेळी सन्मान करण्यात आला. या वेळी शिवप्रेमी युवक गणेशोत्सव मंडळाचे विक्रांत जाधव, शशिराज काळे, निलेश जाधव, राहुल काळे, राजाभाऊ जाधव, उमेश जाधव, सुरेशदादा जाधव, संजय गुजर, संतोष जाधव, सचिन जाधव, अजित काळे, शामकांत जाधव विशाल चव्हाण, मिलिंद जाधव, यश जाधव, विजय पाटील संजय जाधव उपस्थित होते.


## शिवशक्ती अर्बन को-ऑप. बँक लि., बार्शी

**२३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**
**(फक्त सभासदांसाठी)**

शिवशक्ती अर्बन को-ऑप बँक लि., बार्शीच्या सर्व सन्माननीय सभासदांना कळविण्यात येते की, बँकेची २३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार दि. २५/०९/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता** बँकेचे चेअरमन मा. डॉ. प्रकाश गोविंदराव बुरगुटे यांचे अध्यक्षतेखाली संत तुकाराम हॉल बार्शी येथे खालील विषयाच्या विचारार्थ आयोजित करण्यात आली आहे. सदर सर्वसाधारण सभेस आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे.

*** सभेपुढील विषय ***

१. मागील दि. २९/०९/२०२१ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. सन २०२१-२२ चा वार्षिक अहवाल स्वीकृत करणे व दि. ३१/०३/२०२२ चे ताळेबंद पत्रक सन २०२१-२२ या कालावधीचे नफा-तोटा पत्रक स्वीकृत करणे.
३. मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या वर्ष २०२१-२२ च्या नफा वाटणीस मंजुरी देणे.
४. मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या वर्ष २०२२-२३ च्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे. तसेच २०२१-२२ च्या अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मान्यता देणे.
५. मा. वैधानिक लेखा परिक्षक यांच्याकडून आलेल्या वर्ष २०२१-२२ या वर्षाच्या लेखा परीक्षण अहवालाची नोंद घेणे.
६. बँकेच्या सन २०२०-२१ चे वैधानिक लेखापरीक्षण अहवालावरील दोषदुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
७. सन २०२२-२३ मध्ये बाहेरून उभारावयाच्या निधीची मर्यादा ठरविणे.
८. मा. संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईक यांचेकडील कर्जाची माहिती घेणे.
९. सन २०२२-२३ साठी मा. रिझर्व बँकेच्या मान्यतेने, मा. वैधानिक लेखापरिक्षकांची मा. संचालक मंडळाने नियुक्त केलेल्या लेखापरिक्षकास मान्यता देणे.
१०. सन २०२१-२२ साठी मा. अंतर्गत लेखापरिक्षण तसेच आयकर लेखा परिक्षणासाठी मा. संचालक मंडळाने नियुक्त केलेल्या लेखापरिक्षकास मान्यता देणे.
११. महाराष्ट्र शासनाचे परिपत्रकानुसार एकरक्कमी कर्ज फेड योजनेअंतर्गत पात्र कर्जामध्ये दिलेल्या सुटीस मान्यता देणे.
१२. बँकेमार्फत सभासद, संचालक व कर्मचारी यांचे शिक्षण व प्रशिक्षणाची नोंद घेणे तसेच सभेस हजर नसलेल्या सभासदांची रजा क्षमापित करणे.
१३. मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

**स्थळ :-** बार्शी
**दिनांक :-** ०९/०९/२०२२

मा. संचालक मंडळाच्या आदेशावरून
**श्री. भारत श्रीरंग उमाटे**
सरव्यवस्थापक

*** सूचना : १. गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास सदर सभा नियुक्त ठिकाणीच नियोजित वेळेनंतर अर्ध्या तासाने सुरू होईल व त्यासाठी गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही.**

**सभासदांना सूचना : १.** ज्या सभासदांनी मागील वर्षाचा लाभांश नेला नसेल तो न्यावा किंवा खाते उघडावे. पोटनियम क्र. ५८ (ड) अन्वये लाभांशाची रक्कम जाहीर केलेल्या तारखेपासून तीन वर्षांपर्यंत नेली नसेल तर ती राखीव निधीस वर्ग करण्यात येईल. **२.** ज्या सभासदांनी वारसाची नोंद केली नसेल त्यांनी फॉर्म भरून नोंद करून घ्यावी व सर्व खात्यांची KYC पूर्तता करावी. **३.** सभासदांनी पत्त्यात बदल झाला असल्यास नवीन पत्ता तसेच आपले मोबाईल क्रमांक बँकेच्या मुख्य कार्यालयाकडे लेखी स्वरूपात कळवावा. **४.** सभासदांना बँकेच्या कामकाजाविषयी सभेत प्रश्न वा सूचना मांडावयाच्या असतील त्यांनी दि. १८/०९/२०२२ पूर्वी कार्यालयीन वेळेत बँकेचे सरव्यवस्थापक, मुख्यकार्यालय यांचेकडे लेखी द्याव्यात. **५.** पोटनियमानुसार अपूर्ण भागधारणा असणाऱ्या सभासदांनी ज्यादा भाग खरेदी करून नियमानुसार किमान भागधारणा पूर्ण करावी, **६.** बँकेची आर्थिक पत्रके व वार्षिक अहवाल नजीकच्या शाखेच्या मा. शाखा व्यवस्थापक यांचेकडे सभासदांना अवलोकनार्थ उपलब्ध आहे.



**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-Tender Notice**

Digitally signed online bids are invited through E-tender process of MSETCL in two-bid system from bidders who are registered Contractors of MSETCL. **RFx No.7000024582 E-Tender No. SE/EHV/O&M/Circle/SHP/E-Tender:15/2022-2023, Particulars:** Work of providing & fixing of various general asset equipment for newly constructed rest house at 400 kV R.S Division Lamboti. . **Estimated cost: Rs. 4,95,267/- E.M.D. (Approx. 1% of est. cost): Rs 5,000/- Tender cost in Rs.** 500.00+ GST, **Sale period: 06.09.2022** to 14.09.2022, **Last Date of Submission:** 14.09.2022 up to 18:00 Hrs, **Date of opening (Tech. bid):** 15.09.2022 at 12:00Hrs. (If possible). **Contact person:** Superintending Engineer -8888890008. For further details please visit to **https://srmetender.mahatransco.in.**

**Note:** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Superintending Engineer, EHV O&M Circle Solapur**

**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-Tender Notice**

Digitally signed online bids are invited through E-tender process of MSETCL in two-bid system from bidders who are registered Contractors of MSETCL. **RFx No.7000024516 E-Tender No. SE/EHV/O&M/Circle/SHP/E-Tender:14/2022-2023, Particulars:** Providing & fixing of Micro-processor based 0.2S Class, 3-Ph, 4-Wire digital MFM meter for various EHV S/stn under EHV O&M Circle, Solapur. **Estimated cost: Rs. 25,00,000/- E.M.D. (Approx. 1% of est. cost): Rs 25,000/- Tender cost in Rs.** 500.00+ GST, **Sale period: 06.09.2022** to 14.09.2022, **Last Date of Submission:** 14.09.2022 up to 18:00 Hrs, **Date of opening (Tech. bid):** 15.09.2022 at 12:00Hrs. (If possible). **Contact person:** Superintending Engineer -8888890008. For further details please visit to **https://srmetender.mahatransco.in.**

**Note:** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Superintending Engineer, EHV O&M Circle Solapur**

**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors/agencies on Mahatransco E-Tendering website http://srmetender.mahatransco.in for following works**

**Tender No:** EE/400kV/RS(O&M)/DN/LNKD/Tech/T-02/2022-23 **RFX No.7000024588. Work:** E-tender for the work of testing, refilling & reconditioning of various types of fire extinguishers at 400 KV R.S.(O&M) Dn Lonikand-I. **Tender Amount:** Rs.159629.00/-, **EMD:** Rs.5000/-, **Tender Fees:** 500/- + GST **Download of tender documents:** from dtd. 07.09.2022,18:00 dtd. 13.09.2022 upto 23:59 Hrs. **Bid Opening:** dtd. 14.09.2022 after 11:30 Hrs ( Tech Bid) dtd. 14.09.2022 after 14:30 Hrs (price Bid). For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/** and open **above RFX** for downloading tender document, schedules and annexures.



## शिवशक्ती अर्बन को-ऑप. बँक लि., बार्शी

७२५, शिवाजी नगर, बार्शी

**सूचना**

बँकेच्या सर्व खातेदारांना कळविण्यात येते की, मा. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या सूचनेनुसार बँकेच्या प्रत्येक खातेदाराने केवायसी (KYC) पूर्तता करणे गरजेचे आहे. ज्या खातेदारांनी केवायसी पूर्तता केलेली नाही अशा खातेदारांनी बँकेतील नोंदी अद्ययावत करण्याकरिता त्यांचा नवीन फोटो, ओळखीचा पुरावा, पत्त्याचा पुरावा आणि पॅन क्रमांक इ. कागदपत्रे बँकेडे त्वरीत जमा करावे.

ज्या खातेदारांचे खाते, मागील २ वर्षांपेक्षा जास्त कालावधीकरिता वापर न केल्यामुळे 'निष्क्रिय' झाले असेल. त्यांनी त्यांचे खाते सुरू करण्याकरिता जवळच्या शाखेत संपर्क साधून आपला नवीन फोटो आणि केवायसी कागदपत्रे सादर करावीत.

सदरची सूचना देऊनही जे खातेदार केवायसी कागदपत्रांची पूर्तता करणार नाहीत अशा खात्यावरील व्यवहार थांबविले जातील. याची सर्वस्वी जबाबदारी खातेदाराची राहील. कृपया याची नोंद घ्यावी. दिनांक. ०९/०९/२०२२

सही/- **सरव्यवस्थापक**
शिवशक्ती अर्बन को-ऑप
बँक लि., बार्शी

## वेळापूर ग्रामपंचायत येथे क्रांतिवीर उमाजी नाईक यांची जयंती साजरी

**वेळापूर** : वेळापूर ग्रामपंचायत कार्यालय येथे आद्य क्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी क्रांतिवीर उमाजी नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन वेळापूर सरपंच सौ विमलताई उत्तमराव जानकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी वेळापूर ग्रामपंचायत उपसरपंच जावेद मुलाणी, ग्रामपंचायत सदस्य संजयआबा मंडले, धानोरे सरपंच जीवन जानकर, लखन मंडले, रामकृष्ण जाधव, पत्रकार शिवाजी मंडले ,निवृत्ती भुसारे, नजीरभाई शेख, जब्बार मुलाणी, यात्रा कमिटी अध्यक्ष सुखदेव आडत, बाबा चंदनशिव, जवान माने देशमुख, वसंत क्षिरसागर, जीवन वाघे, रामा शेंडगे, बापू मंडले विनायक भगत,ग्रामस्थआणि ग्रामपंचायत कर्मचारी वर्ग आदि. उपस्थित होते.

## वेळापूर येथे राजे उमाजी नाईक यांचे जयंती साजरी

**वेळापूर** : वेळापूर तालुका माळशिरस येथे आद्य क्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी राजे उमाजी नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्ह्याचे नेते उत्तमराव जानकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मार्केट कमिटीचे माजी संचालक दादासाहेब पाडगे, वेळापूर ग्रामपंचायत सदस्य संजयआबा मंडले, निवृत्ती भुसारे ,लखन मंडले, शिवाजी मोहिते, जवान माने देशमुख, उमेश भानवसे,संभाजी जाधव, दादा गालफाडे, सविनाश माने, सुमित साखरे आदी. सह ग्रामस्थ उपस्थित होते.

## मळोली जनता विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे एनएमएमएस परीक्षेत घवघवीत यश

**वेळापूर** : मळोली तालुका माळशिरस येथील जनता विद्यालय व जुनिअर कॉलेज मळोली या शाळेने एन एम एम एस परीक्षेत घवघवीत यश मिळवले आहे. या परीक्षेला जनता विद्यालयातून ८ विद्यार्थ्यांनी सुयश मिळवले आहे. या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यां शिष्यवृत्ती परीक्षेत एका विद्यार्थीला प्रतिवर्षी १२ हजार रुपये प्रमाणे ४८ हजार रुपये शिष्यवृत्ती मिळणार आहे तसेच एन एम एम एस शाहू महाराज सारथी शिष्यवृत्तीसाठी ६ विद्यार्थिनी सुयश मिळवले आहे. एका विद्यार्थ्याला प्रति वर्ष ९ हजार ६०० रुपये प्रमाणे ३८ हजार ४०० रुपये शिष्यवृत्ती मिळणार आहे. ८ विद्यार्थ्यांना एकूण २ लाख ७८ हजार ४०० रुपये शिष्यवृत्ती मिळणार आहे. एन एम एम एस शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी मानसी गायकवाड, प्राजक्ता महाडिक, अनुष्का इंगोले, श्रेया कदम, सायली जाधव, पायल जाधव, साक्षी साळुंखे या ८ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळणार आहे. सुयश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा पंचायत समिती सदस्य आणि मळोली ग्रामपंचायतचे मार्गदर्शक रणजीत सिंह जाधव यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी प्रभाकर इंगळे सरदेशमुख,मोहित जाधव, शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षकवर्ग उपस्थित होते.

## लोकविकास मध्ये शिक्षक दिन उत्साहात साजरा

**वेळापूर** : लोकविकास मराठी मिडियम स्कूल, वेळापूर येथे शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. डॉ. राधाकृष्णन सर्वपल्ली व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाला लोकविकास मराठी मिडियमचे मुख्याध्यापक सुनील पताळे अध्यक्ष म्हणुन उपस्थित होते.चैत्राली माने देशमुख, श्रावणी म्हेत्रे, राजनंदिनी जाधव,श्रावणी मोहिते, वश साळुंखे, आदिती स्वामी, तृप्ती जाधव. यांनी शिक्षकाविषयी आपले मनोगत व्यक्त केले. शिक्षक प्रतिनिधी म्हणून अरुणा बनसोडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी गुलाब पुष्प देऊन शिक्षकांचा सत्कार केला. कार्यक्रमास, राया वायमारे, सिनाप्पा शेंडगे, अमोल साठे, ऋषिकेश राऊत, महेश काळे, विजया चापले, अरुणा बनसोडे, विद्या स्वामी,कविता बनकर आदी. शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन राणी जाधव हिने केले, प्रास्ताविक अनुष्का म्हेत्रे तर आभार श्रुती कदम हिने मानले.

# कुष्ठरोग, क्षयरोगाचे समूळ उच्चाटन करा

■ मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांच्या सूचना

सुराज्य/सोलापूर

**राज्य शासन कुष्ठरोग, क्षयरोग संपवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. जिल्ह्यात १३ ते ३० सप्टेंबर २०२२ पर्यंत प्रत्येक घरोघरी जावून कुष्ठरोग आणि क्षयरोगाचा सर्वे करण्यात येणार आहे. ही मोहीम प्रभावीपणे राबवत कुष्ठरोग आणि क्षयरोगाचे समूळ उच्चाटन करा, अशा सूचना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी आरोग्य विभागाला दिल्या.**

जिल्हा परिषदेमध्ये कुष्ठरोग शोध मोहीम आणि सक्रिय क्षयरूग्ण शोध मोहिमेबाबत जिल्हास्तरीय समन्वय समितीची बैठक गुरूवारी पार पडली. यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. शितलकुमार जाधव, जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. अनिरूद्ध पिंपळे, जिल्हा आयुष अधिकारी डॉ. विलास सरवदे, मनपा आरोग्य अधिकारी डॉ. बसवराज लोहारे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत कुलकर्णी यांच्यासह समिती सदस्य उपस्थित होते.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी स्वामी म्हणाले, कुष्ठरोग आणि क्षयरोग हा आजार बरा होणारा आहे. तपासणी न करता आजार अंगावर काढू नका. आजार लपवू नका. यामुळे रूग्ण दगावू शकतो. नागरिकांनी लक्षणे दिसताच शासकीय दवाखान्यात तपासणी करून घ्यावी. संशयीत रूग्णांवर प्राथमिक आरोग्य केंद्र, नागरी आरोग्य केंद्र किंवा सिव्हील हॉस्पिटलमध्ये उपचार करण्यात येत आहेत. कारागृहे, आश्रमशाळा याठिकाणीही सर्वे करण्यात येणार आहे. कुष्ठरोग, क्षयरोग सर्वे करण्यासाठी आरोग्य कर्मचारी, आशा प्रत्येक घरी भेट देऊन तपासणी करणार आहेत. आशांच्या सोबतीला गावातील पुरूष स्वयंसेवकाची नेमणूक करण्यात येणार आहे. यामुळे प्रत्येक ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्रामसेवक, सदस्य यांनी नागरिकांना या मोहिमेबाबत माहिती द्यावी. शिवाय आरोग्य कर्मचारी, आशा यांना सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी सीईओ स्वामी यांनी केले.

मागील वर्षी कुष्ठरोगाचे ९६ रूग्ण आढळून आले होते. त्यांच्यावर योग्य प्रकारे उपचार करण्यात आले आहेत. यावर्षी कुष्ठरोग आणि क्षयरोग सर्वेसाठी २ हजार ७६८ टीम तयार केल्या असून या टीम रोज २५ घरांचा सर्वे करणार आहेत. आरोग्य कर्मचारी, आशा यांना सर्वेबाबत प्रशिक्षण देण्यात आले आहे. ध्वनीक्षेपक, दवंडी, हस्तपत्रिका, पोस्टर्स, बॅनर्सद्वारे प्रसिध्दीचे नियोजन आहे. शालेय प्रभात फेरी, प्रश्नमंजुषा, रांगोळी व निबंध स्पर्धा, खाजगी डॉक्टर कार्यशाळा, महिला मंडळ सभा असे कार्यक्रमही घेण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जाधव यांनी दिली.

# प्रताप क्रीडा मंडळाच्यावतीने ग्रामीण खेळाडूंसाठी क्रीडा शिबीर

**अकलूज** : ग्रामीण भागातील खेळाडूंना आंतरराष्ट्रीय खेळाचे व्यासपीठ उपलब्ध व्हावे आंतरराष्ट्रीय खेळातील कौशल्याचे प्रशिक्षण मिळावे या हेतूने प्रताप क्रीडा मंडळ, शंकरनगर-अकलूज यांच्या वतीने खेळाडूंसाठी वर्षभर नियमित क्रीडा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सहकार महर्षि शंकरराव मोहिते पाटील इंजिनिअरिंग कॉलेज, शंकरनगर येथे आयोजित केलेल्या या प्रशिक्षण शिबिरामध्ये वेटलिफ्टिंग, हॉलीबॉल, ॲथलेटिक्स, कबड्डी या खेळांचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

यासाठी मंडळाच्या वतीने या खेळातील तज्ञ प्रशिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. शिबिराचे उद्घाटन व मैदानाचे पूजन युवा नेतृत्व चि. सयाजीराजे संग्रामसिंह मोहिते-पाटील यांच्या शुभहस्ते व मंडळाच्या अध्यक्षा कु. स्वरूपाराणी जयसिंह मोहिते-पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले.

या कार्यक्रमाची सुरुवात माळशिरस तालुक्याचे भाग्यविधाते सहकारमहर्षी शंकरराव मोहिते-पाटील व रत्नप्रभादेवी मोहिते पाटील यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक क्रीडा शिक्षक अरविंद वाघमोडे यांनी केले. त्यांनी या प्रशिक्षणाचा हेतू व उद्देश सांगून आपली ध्येये, आवड, विचार, आरोग्य, निश्चित करण्यासाठी तसेच मानसिक, बौध्दिक, शारीरिक सुदृढतेसाठी जीवनात खेळातील सहभागाचे अत्यंत महत्व असल्याचे सांगितले. या प्रशिक्षण शिबिरात तालुक्यातील ६८ मुले व ५१ मुली असे एकूण ११९ खेळाडूंनी सहभाग नोंदविला. वर्षभर हे क्रीडा शिबीर सायंकाळी ५.३० ते ७.०० या वेळेत घेण्यात येणार आहे. या समारंभास मंडळाचे उपाध्यक्ष प्रताप पाटील, सचिव पोपट भोसले पाटील, संचालक ,सदस्य, प्रशिक्षण प्रमुख श्री.संजय राऊत, अर्जुन बनसोडे, तानाजी शिंदे, खेळाडू, पालक बहुसंख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन किरण सूर्यवंशी यांनी केले तर आभार यशवंत माने देशमुख यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विक्रमसिंह बागल, नागनाथ फिरमे यांनी परिश्रम घेतले. उदघाटन समारंभानंतर तज्ज्ञ प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षणास सुरुवात झाली.

## बँक ऑफ इंडियाच्यावतीने पीक कर्ज मेळावा

सुराज्य/पिलीव

यापुर्वी बँक ऑफ इंडियाच्या पिलीव शाखेतुन शेतकऱ्यांना पिक कर्ज उपलब्ध होत नव्हते मात्र यासाठी कुसमोडचे माजी उपसरपंच संजय पाटील यांनी शासन स्तरावर पाठपुरावा केल्यानंतर कुसमोड येथील शेतकऱ्यांना बँक ऑफ इंडिया मधुन कर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यामुळे शेतकऱ्यांनमधुन आनंद व्यक्त केला जात आहे.

माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील शेतकऱ्यांना बँक ऑफ इंडिया च्या वतीने पिक कर्ज उपलब्ध व्हावे यासाठी सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. यासाठी सोमवार दिनांक १२ सप्टेंबर रोजी दुपारी चार वाजता ग्रामपंचायत कार्यालय याठीकाणी शेतकऱ्यांनसाठी पिक कर्ज मेळावा आयोजित करण्यात आला आहे. सर्व छोट्या मोठ्या शेतकऱ्यांना करा उपलब्ध करुन देण्यासाठी पिलीव येथील बँक ऑफ इंडियाचे शाखाधिकारी नाईक ,कृषी अधिकारी मोटेसाहेब व इतर अधिकारी शेतकऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन करणार आहेत.

## पिलिवमध्ये गणेशोत्सवानिमीत्त सामाजिक उपक्रम

**पिलीव** : राष्ट्रसेवा आणि समाजसेवेची भावना मनात ठेवून पिलीव गावातील जनसेवा गणेश मित्र मंडळांनी सोमवारी हे रक्तदान शिबीर आयोजित केले होते. या शिबिराला कार्यकर्त्यांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला. यावेळी सुमारे ६१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. कोणताही वायपट खर्च, न करता एक चांगला सामाजीक उपक्रम राबबिला, पिलिव मध्ये गणेश उत्सव दरम्यान अनेक कार्यक्रम होतात.

रक्तदान शिबीरासारखा उपक्रमांमुळे इतर ही मंडळांना चांगला संदेश जातोय. प्रथम जनरल बिपीनजी रावत, सिंधुताई सपकाळ, बाबासाहेब पुरंदरे यांच्या विचारावर संकेत देशमुख यांनी भरपुर उजाळा दिला. गणेश आरती नतंर शिबीर चालू करण्यात आले यावेळी मंडळाचे संस्थापक संकेत देशमुख, सरपंच नितिन माळी, सुजित सातपुते, पत्रकार संघाचे अध्यक्ष शुभजित नष्टे, कणसे हवालदार, राजाभाऊ तावरे, शिरीष तावरे, अतिश जेऊरकर, विनायक बुधावले, ओकांर बुगड, राणासिंग भैस, चेतन बुगड, अथर्व तेली, सुरज पिसे, पार्थ गवळी, शिरीष स्वामी, रियाज तांबोळी, इंजी. स्वप्नील भंडलकर, व अन्य मान्यवर उपस्थित होते.

# डॉ.कुलकर्णी यांना मंडईचा राजा पुरस्कार

सुराज्य/नातेपुते

मंडईचा राज हनुमान गणेशोत्सव मंडळ नातेपुते यांच्यावतीने गणेशोत्सव मंडळामध्ये अनेक सामाजिक, शैक्षणिक समाज उपयोगी उपक्रम राबवण्यात आले. तसेच दर सालाबाद प्रमाणे देण्यात येणारा मानाचा मंडईचा राजा पुरस्कार २०२२ चा मानकरी नातेपुते येथील डॉ.अनिकेत हरीश कुलकर्णी यांना देण्यात आला.

अनिकेत कुलकर्णी यांनी कोरोना कालावधीमध्ये उपचार दरम्यान रुग्णांना घरी जाऊन औषधोपचार करून अनेकांचे प्राण वाचवले होते. अनेक रुग्णांवर मोफत उपचार केले होते. या केलेल्या वैद्यकिय कार्याची दखल घेऊन श्री.हनुमान गणेशोत्सव मंडळाने डॉ. अनिकेत हरीश कुलकर्णी यांना नातेपुते पोलीस ठाण्याचे सपोनी प्रवीण संपांगे, माजी सरपंच अमरशील देशमुख नगराध्यक्षा उत्कर्षाराणी पलंगे यांच्या हस्ते मानाची शाल, सन्मान चिन्ह, व कोरोना सन्मानपत्र देऊन मंडईचा राजा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यावेळी अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती जननायक मामासाहेब पांढरे, उद्योजक अतुल बावकर, शिवसेनेचे नेते अमोल उराडे, भाजपा नातेपुते शहराध्यक्ष भैय्यासाहेब चांगण, नगरसेविका माया उराडे, शर्मिला चांगण नगरसेवक शशिकांत बरडकर, रावसाहेब पांढरे तसेच आप्पासाहेब भांड, डॉ.नरेंद्र कवितके, अभिजीत वाळके, प्रकाश पदमन मंडळाचे अध्यक्ष निखिल देसाई उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शिक्षक दिनाचे औचित्य साधून शिक्षक, आशा सेविका यांचा मंडळाच्या वतीने सन्मान करण्यात आला. तसेच उपस्थित ज्या कुटुंबांना रेशन कार्ड नाही अशा कुटुंबांना धान्य वाटप करण्यात आले.

स्पर्धा परीक्षेत यश मिळवलेल्या विद्यार्थी विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. अक्षरा दोशी या मुलीने ५ दिवस कडक उपवास केल्याबद्दल तीचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रकाश पदमन यांनी केले. आभार व सुत्रसंचालन सुखदेव वलेकर यांनी केले. कार्यक्रमासाठी मंडळाचे अध्यक्ष निखिल देसाई तसेच विजय पिसे, अमित चांगण, ओंकार भिसे, अभिजीत पदमन, अमर भिसे तसेच मंडळाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# अकलूजमधील पान शॉपवर धाड; मावा व गुटखा जप्त

सुराज्य/अकलूज

अकलूज येथिल सदुभाऊ चौकातील सदाशिवराव माने विद्यालया समोरील ए वन पान शाँप या दुकानावर अन्न सुरक्षा अधिकारी प्रज्ञा सुरसे यांनी छापा टाकून प्रतिबंधित गुटखा व मावा जप्त करुन विक्रेत्यावर अकलूज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. नागरीकांच्या तक्रारीवरुन ही कारवाई करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार सदाशिवराव माने विद्यालय या सदभाऊ चौकातील शाळेच्या समोरच असलेल्या ए वन पान शाँप मध्ये खुलेआम प्रतिबंधित गुटखा व माव्याची विक्री होत असल्याची तक्रार सोलापूर येथिल अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्याना मिळाली, तक्रारीची तातडीने दखल घेत पथकाने ए वन पान शाँप या दुकानावर छापा टाकला.यावेळी दुकानामध्ये प्रतिबंधत ८५ पाऊच आरएमडी पान मसाला, एम सेंटेड तंबाखू ६० पाऊच व तंबाखू युक्त मावा आढळून आला.

याबाबत अन्न सुरक्षा अधिकारी प्रज्ञा सुरसे यांच्या तक्रारी वरुन दुकानदार अतिक अकबर शेख, वय २४ वर्षे, रा. शिवतेजनगर-यशवंतनगर यांचे विरुध्द अन्न सुरक्षा व मानदे कायद्यातील शिक्षापात्र कलम ५९ व भादविसक १८८, २७२, २७३, ३३८ प्रमाणे गुन्हा दाखल करुन आरोपी दुकानदारास ताब्यात घेण्यात आले आहे. सदरचे पान शॉप हे शाळेच्या नजीक असल्याने कारवाई करण्यात आली आहे. इतर पान शॉप वाल्यानी प्रतिबंधित गुटखा व मावा विक्री बंद करावे अन्यथा त्यांच्यावरही कारवाई करण्यात येईल असे माहिती अन्न सुरक्षा अधिकारी प्रज्ञा सुरसे म्हणाल्या. पुढील तपास पोलीस अकलूज पोलीस ठाण्याचे पोलीस उप निरीक्षक एस. बी. जगताप हे करत आहेत.

## अकलूजमध्ये विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

**अकलूज** : कृष्णा गणेशोत्सव मंडळ महानुभाव मठ लोणार गल्ली अकलूज यांच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मुले नंबर ४ अकलूज या शाळेतील मुलांना शालेय साहित्य(वह्या, पेन, पेन्सिल) वाटप करण्यात आले यावेळी मंडळाचे ज्येष्ठ सदस्य नवनाथ रामचंद्र बेलपत्रे, जयसिंह शिवाजी थिटे व पदाधिकारी आदित्य नवनाथ बेलपत्रे, रेवण नवनाथ बेलपत्रे, विशाल जयसिंह थिटे, ओंकार नवनाथ बेलपत्रे, उत्कर्ष उत्तम शिंदे, विश्वतेज रमेश बिडवे, विजय अविनाश साखरे इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.

सुराज्य सोलापूर
Classified
व्यवसाय
● सुवर्णसंधी !!! पॅन्ट-शर्ट, कंपनीचे, दवाखान्याचे, शाळेचे, मंडळाचे ड्रेस ५०० रुपयांत शिवून मिळतील. एम्पोरा टेलर्स, तैमूरअली : 8888651182
(१०९२२)
विवाहविषयक
● सर्वधर्मीय वधु-वर सुचकांची नाव नोंदणी सुरू आहे. संपर्क : 9673183170
(१०९२२)

# आठवडा झाला मश्रुम गणपतीचा कळस काही मिळेना

■ संशयीत आरोपी ताब्यात, चोर मात्र मोकाट
■ विसर्जनपूर्वीच मंदिरावर कळस लावण्याचे आश्वासन फेल जाणार

सुराज्य/उत्तर सोलापूर

सोलापूर शहर व जिल्ह्यात प्रसिध्द असलेल्या मश्रुम गणपतीचा कळस ऐन बप्पाचा आगमनादिवशीच दुसऱ्या वेळीस चोरीला गेला. जवळपास चाळीस तोळे सोने व २८ किलो पंचधातु मिळून तब्बल २५ लाखा पर्यंतचा कळस चोरीला गेल्याने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली. उडालेली खळबळ शांत करण्यासाठी कळस चोरी करणारे चोर कळसासह बप्पा वविसर्जनापूर्वीच आणून पुन्हा बसविणार असे ग्रामीण पोलीस अधीक्षक सातपुते यांनी सांगितले आहे. ह्या घटनेला तब्बल सात दिवस होत आले असले तरी अजूनही चोर सापडत नसल्याने संशय व्यक्त केला जात आहे.



सोलापूर ते तुळजापूर रोड लगत तलेहीप्परगा गावात मश्रुम गणपती चा कळस चोरीला गेला. घटनास्थळी सोलापूर ग्रामीण, तालुका पोलीस प्रशासनाणे पाहणी केली. पुढील तपास गुन्हे शाखेकडे देण्यात आला. सोलापूर ग्रामीण पोलीस आयुक्त तेजस्वी सातपुतेनी आश्वासन दिले, गणपती विसर्जन कळस लावूनच करू, भक्तांनी कळस पुन्हा मंदिरावर दिसणार म्हणून आशा मनात धरली.९ तारखेला गणपती बप्पाला निरोप देण्यात येणार आहे. अजून तरी कळस देवळावर दिसला नसून आशेची निराशा होणार का असी शंख्या भाविकातून केली जात आहे.

२०१६ रोजी घडलेल्या घटनेत गावातील काही लोकांचा समावेश होता, पुन्हा चोरी होऊ नये म्हणून सुरक्षा यंत्रणेत भर घातला होता. घडलेल्या घटनेत त्यांच त समाजातील लोकांना ताब्यात घेऊन चौकशी चालू आहे. पुन्हा एकदा गावातीलच लोकांचा सहभाग असल्यास आमची नामुष्की होणार हे मात्र नक्कीच आहे. पोलीस प्रशासनाने ताबडतोब तपास लावावा हीच विनंती

**- राजू होशेट्टी**

२०१६ मध्ये असाच प्रकार घडला होता. त्यावेळचे पोलीस अधीक्षक विरेश प्रभू यांनी तपासाची गती वाढवून चोरास मुद्देमालासाह पकडण्यात आले होते. मंदिर समितीच्या ताब्यात कळस देण्यात आल्याने सर्व भक्तांनी आभार व्यक्त केलं होतं.यंदाच्या वर्षी त्याच घटनेची पुनरावृत्ती झाली. आगमना दिवशीच तब्बल पोलिसांनी काढलेले मूल्यांकन प्रमाणे १५लाख, मंदिर समितीच्या मुल्यांकन प्रमाणे जवळपास २५ लाखाचा कळस चोरीला गेला. चोरीची घटना घडून आठ दिवस होत आले. अजूनही ना कळस ना चोर सापडत नाही,संशयित म्हणून गावांतील चार ते पाच जणांना ताब्यात घेऊन सत्य उलगडण्याचा प्रयत्न केला जात आहे.ज्यांना ताब्यात घेतले आहे ते मागील घटनेशी संबंध आहे असे बोलले जात आहे. मुद्देमालासाह चोर लवकरच सापडेल असे पोलीस प्रशासनाच्या वतीने सांगितले जात असून विसर्जनापूर्वी मंदिरावर कळस चढविला जाणार का, भक्तांच्या आशेवर पाणी पडणार का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

# सामान्य नागरिक केंद्रबिंदू ठेवून सुशासन नियमावली करावी

## मुख्यमंत्री शिंदे यांचे निर्देश

सुराज्य/मुंबई

सामान्य नागरिक केंद्रबिंदू ठेऊन त्यांना शासकीय सेवा आणि योजनांचा लाभ सुलभरित्या मिळावा यासाठी सामान्यांच्या समस्या आणि शासकीय कार्यपध्दती यांची सांगड घालत सुशासन नियमावली करावी, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे दिले. कृषी, आरोग्य, माहिती तंत्रज्ञान, शिक्षण आदिवासी विकास, रोजगार निर्मिती या क्षेत्रांना विशेष प्राधान्य देऊन अन्य राज्यांना आदर्श ठरेल अशी नियमावली तयार करावी, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

सुशासन नियमावली तयार करण्याकरिता नियुक्त समितीची आज वर्षा निवासस्थानी बैठक झाली. त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते. या समितीचे अध्यक्ष निवृत्त तत्कालीन उपलोकायुक्त सुरेश कुमार, माजी मुख्य सचिव तथा समिती सदस्य जयंतकुमार बांठिया, स्वाधीन क्षत्रिय, के. पी. बक्षी, अजितकुमार जैन, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव यावेळी उपस्थित होते.

शासनाच्या सेवा नागरिकांना अधिक सुलभ व पारदर्शी पध्दतीने मिळाव्यात तसेच शासन व नागरिक यांच्यातील अंतर कमी करण्यासाठी सुशासन नियमावलीमध्ये त्याचा अतर्भाव करावा, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. प्रशासनाचे सुशासन होण्यासाठी सुशासन नियमावली उपयुक्त होईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

प्रशासन गतिमान करतानाच माहिती आणि तंत्रज्ञानाचा अधिक प्रभावीपणे वापर करण्याची गरज आहे.शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजना,शेतकऱ्यांसाठी जोडधंदा, शेतीत आधुनिक तंत्रज्ञान यासाठी समितीने उपाययोजना सुचविताना त्या क्षेत्रातील तज्ज्ञांची मदत घ्यावी, असेही मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी सांगितले. विभागीय स्तरावर असलेल्या मुख्यमंत्री कार्यालयाचे कामकाज अधिक गतिमान करण्याच्या सूचना यावेळी शिंदे यांनी दिल्या. शासनाविषयी लोकांच्या मनात सकारात्मक भावना निर्माण करण्यासाठी सुशासन नियमावली महत्वाची भूमिका बजावणार असल्याचे मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. मुख्य सचिवांनी यावेळी प्रस्ताविक केले. यावेळी समिती अध्यक्ष श्री. सुरेश कुमार व सदस्यांनी समितीने केलेल्या कार्याबाबतची माहिती दिली.

आदिवासी भागात कुपोषणासारखी समस्या कायमच भेडसावत असते अशा वेळी ज्या योजना आहेत त्यांच्या अंमलबजावणीतील त्रुटी शोधून त्यावर देखील समितीने उपाययोजना सुचवाव्यात असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. शिक्षण, आरोग्य, रोजगार निर्मिती या क्षेत्रांना विशेष प्राधान्य देण्यात येत असून पायाभूत सुविधांच्या कामांची गुणवत्ता यासाठी संनियंत्रण करणारी यंत्रणा समितीने सुचवावी.

अतिवृष्टीमुळे कोल्हापूर सारख्या भागात पूर येतो, लहरी हवामानामुळे अतिवृष्टी, दुष्काळ यासारख्या नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लागते यासाठी शासनाकडून वेळोवेळी मदत केली जाते, मात्र अशा नैसर्गिक आपत्तींबाबत प्रतिबंधात्मक उपाययोजना करून नागरिकांना दिलासा देण्यासाठी या समितीने त्याचा सुशासन नियमावलीमध्ये समावेश करावा, अशी सूचनाही शिंदे यांनी यावेळी केली.

फायलींचा जलदगतीने निपटारा याविषयावर देखील समितीने अभ्यास करतानाच दप्तर दिरंगाई कायद्याची अमंलबजावणी अधिक प्रभावीपणे होण्यासाठी नियमावलीमध्ये त्याचा समावेश करावा, असे सांगत लोकांचे काम वेळेवर झाले तरच त्याला सुशासन म्हणता येईल, नागरिकांना कामांसाठी शासकीय कार्यालयात हेलपाटे मारावे लागू नये, त्यांची भटकंती थांबावी, क्षेत्रीयस्तरावरच त्यांच्या समस्यांचा निपटारा व्हावा मंत्रालयापर्यंत त्यांना यायची गरज भासू नये, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

## कांदा उत्पादक संकटात; दर गडगडले

सुराज्य/पुणे

लागवडीपासून सुरू झालेले कांदा पिकामागील शुक्लकाष्ट यंदा सुरूच आहे. दर्जेदार, निर्यातक्षम कांदा बाजारात येत नसल्याने मागणी नसल्याचे व्यापारी सांगत आहेत. परिणामी दरही पडले आहेत. बाजारात नेलेला कांदा वेळेत विक्री होत नाही. त्यात भर म्हणून पावसाळी वातावरणामुळे हवेतील आद्रता वाढून चाळीत ठेवलेला कांदा सडू लागला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. कांदा उत्पादक शेतकऱ्यांकडे राज्याबरोबर केंद्र सरकारचेही दुर्लक्ष होत असल्याचा आरोप शेतकरी करीत आहेत.

नाशिकच्या कळवण तालुक्यातील बार्डे येथील कांदा उत्पादक शेतकरी पंडित वाघ यांनी दिलेल्या माहितीनुसार यंदा लागणीपासूनच संकट निर्माण झाले आहे. थंडीत कांद्याची लागवड होते. कांदा जसजसा मोठा होईल, तसतसे तापमानात थोडी थोडी वाढ होत जाऊन कांदा काढणीला येण्याच्या काळात उष्णता वाढणे कांदा पिकाला पोषक असते. पण, यंदा अचानक थंडी, अचानक उष्णता,

अशी स्थिती निर्माण झाली होती. त्याचा फटका कांद्याला बसला. चाळीत साठवलेला कांदा फार तर पाच महिने चांगला राहतो. विक्रीसाठी कांदा बाजारात नेला तरीही सौदे वेळेवर होत नाहीत. आठवडा सुट्टीचा दिवस वगळूनही कामगार नाहीत, मागणी नाही, असे सांगून बाजार बंद ठेवला जातो. त्यामुळे आवक वाढून दर आणखी पडतात. सध्या सरासरी ९०० ते १२०० रुपये प्रति क्विंटल दर मिळतो आहे.

## हाजी अली दर्गाह परिसरात जगातील सर्वात मोठा ध्वजस्तंभ

सुराज्य/मुंबई : मुंबई हाजी अली दर्गाह परिसरात जगातील सर्वात उंच ध्वजस्तंभ उभारण्यात येणार असून त्यावर भारताचा राष्ट्रध्वज लावण्यात येणार असल्याची माहिती हाजी अली दर्गाचे ट्रस्टी सोहेल खंडवानी यांनी दिली आहे. या दर्ग्याचे नुतनीकरण सुरू असून ध्वजस्तंभ उभारणीचे कामही सुरू आहे. तसेच या राष्ट्रध्वजाच्या अनावरणासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आमंत्रित करणार असल्याचंही ते म्हणाले.

देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना वासंदर्भात त्यांच्याशी चर्चा झाली होती. ही कल्पना त्यांना आवडली होती.

## पुढील वर्षीपासून नावीन्यपूर्ण पुस्तके

सुराज्य/पुणे : पुणे : राज्यातील पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना पुढील वर्षीपासून पाठ्यपुस्तकातच लेखनासाठी कोरी पाने असलेली पाठ्यपुस्तके दिली जाणार आहेत.

या पुस्तकाचे तीन किंवा चार भाग असतील. सत्रानुसार विद्यार्थ्यांनी तो भाग येऊन जायचा असल्याने दप्तराचे ओझेही वाढणार नाही. प्रायोगिक तत्त्वावर काही पाठ्यपुस्तके तयार करण्यात आल्याची माहिती शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी बुधवारी दिली. शालेय शिक्षणमंत्री पदाची सूत्रे येतल्यानंतर केसरकर यांनी शालेय शिक्षण विभागातील सर्व विभागांची आढावा बैठक बुधवारी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळात येतली. शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल, मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी, सचिव अनुराधा ओक, बालभारतीचे संचालक कृष्णकुमार पाटील, माध्यमिक शिक्षण विभागाचे संचालक महेश पालकर यांच्यासह उपसंचालक, शिक्षणाधिकारी आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## शिक्षकांची छायाचित्रे भितींवर लावण्याचा निर्णय मागे

सुराज्य/पुणे

शिक्षकांची छायाचित्रे शाळेतील वर्गाच्या भितींवर लावण्याऐवजी आता छायाचित्रे शिक्षक परिचय फलकावर समाविष्ट केली जातील. शिक्षकांची छायाचित्रे लावण्याचा निर्देश केंद्राने दिलेला असल्याने तो डावलता येणार नाही. मात्र छायाचित्रे लावण्यास राज्यातून विरोध होत असल्याने मध्यममार्ग काढण्यात आला आहे. त्याला प्राथमिक शिक्षक संघाने सकारात्मक प्रतिसाद दिल्याची माहिती शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी बुधवारी दिली.

केसरकर म्हणाले,की शिक्षकांची छायाचित्रे लावल्याने विद्यार्थ्यांनाही आपले शिक्षक कोण आहेत हे कळेल. तुलनेने महाराष्ट्रात गैरप्रकार कमी होतात. त्यामुळे राज्यातून शिक्षकांची छायाचित्रे लावण्यास विरोध झाला. त्यामुळे शिक्षकांची छायाचित्रे शिक्षक परिचय फलकावर लावण्याचा मध्यममार्ग काढण्यात आला. त्याला बऱ्याच शिक्षक संघटनांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

बोगस शिक्षकांना चाप लावण्यासाठी 'आपले गुरुजी' उपक्रमाअंतर्गत शिक्षकांची छायाचित्रे शाळेतील वर्गाच्या भितींवर लावण्याच्या निर्णयाला राज्यभरातून शिक्षक, शिक्षक संघटनांकडून तीव्र विरोध करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर शिक्षण विभागाच्या आढावा बैठकीसाठी शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर पुण्यात आले असता माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी ही माहिती दिली.

## राणांचा लव्ह जिहादचा दावा खोटा

सुराज्य/अमरावती

खासदार नवनीत राणा यांनी एका मुलीच्या संदर्भाने लव्ह जिहादचा आरोप करत अमरावतीच्या राजापेठ पोलीस स्टेशनमध्ये काल राडा घातला. मुलीला आत्ताच्या आता आमच्यासमोर हजर करा, म्हणत त्यांनी पोलिसांशी हुज्जत घातली. तसेच पोलिसांनी कॉल रेकॉर्ड केल्याचा आरोप करत जवळपास २० मिनिटे पोलीस स्टेशनमध्ये गोंधळ घातला. या साऱ्या कालच्या प्रकरणानंतर पोलिसांनी वेगाने सूत्रे फिरवत तरुणीचा शोध घेतला. मात्र संबंधित तरुणीने काही कारणांना कंटाळून रागाच्या भरात घर सोडून गेले असल्याचं पोलिसांना सांगत नवनीत राणांना तोंडावर पाडलं. अमरावतीच्या पोलीस आयुक्त आरती सिंह यांनी माध्यमांना प्रतिक्रिया देताना मुलीचा जबाब वाचून दाखवला.

राजापेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील १९ वर्षीय वयाची युवती मंगळवारी रात्री बेपत्ता

झाली. त्यासंदर्भात तरुणीच्या वडिलांनी पोलिसांत तक्रार दिली. पोलिसांनीही तरुणीचा शोध घेण्यासाठी तातडीने सूत्रे फिरवली. पण त्याचदरम्यान खासदार नवनीत राणा यांनी राजापेठ पोलिस ठाण्यात याप्रकरणावरुन राडा घातला. शहरातील आंतरधर्मीय विवाह व लव्ह जिहाद प्रकरणातील मुलाशी थोडा कठोर व्यवहार करा, असे सांगण्यासाठी फोन केल्यानंतर मनीष ठाकरे यांनी आपला कॉल रेकॉर्ड केला. त्याबाबत जाब विचारण्यासाठी आपण पोलीस ठाण्यात दाखल झाल्याचे राणा म्हणाल्या. यादरम्यान पोलीस आणि खासदार राणा यांच्यात जोरदार धुमश्चक्री उडाली. काल या संपूर्ण प्रकरणाची राज्यात जोरदार चर्चा झाली.

दरम्यान, दोन दिवसांपूर्वी बँकेत जात असल्याचे सांगून घरातून बेपत्ता झालेली तरुणी बुधवारी रात्री साताऱ्यात सापडली. पुणे जीआरपी आणि सातारा पोलिसांनी मुलीला गोवा एक्स्प्रेसमधून ताब्यात घेतले. 'लव्ह जिहाद'साठी या तरुणीचे अपहरण करण्यात आलं होतं, असा सनसनाटी आरोप खासदार नवनीत राणा यांनी केला होता. मुलीला ताब्यात घेतल्यानंतर पोलिसांनी तिचा जबाब नोंदवला. यावेळी काही कारणांनी रागाच्या भरात मी घर सोडलं, असं तरुणीने पोलिसांनी सांगितलं. तशी माहिती अमरावतीच्या पोलीस आयुक्त आरती सिंह यांनी माध्यमांना दिली.

पोलिसांनी या प्रकरणात एका संशयित युवकाला ताब्यात घेऊन चौकशी सुरू केली होती, पण युवकाने आपण अपहरण केले नसल्याचे सांगितले.

## सीट बेल्टला फाटा, मृत्यूचा वाढला टक्का

सुराज्य/नाशिक

देशांतर्गत रस्ता सुरक्षेचा मुद्दा गंभीर वळणावर असून, दुचाकीस्वारांसहित कारचालकही नियमभंग करत असल्याने अपघाती मृत्यू वाढत आहेत. नाशिक परिक्षेत्रातही ही समस्या चिंताजनक असून, अहमदनगर आणि धुळ्यात सर्वाधिक नियमभंग होत आहेत. गतवर्षभरात विनासीटबेल्ट असलेल्या एक लाख कारचालकांना दोन कोटी रुपये, तर ५७ हजार दुचाकीस्वारांना विनाहेल्मेटमुळे पावणेतीन कोटी रुपये दंड ठोठावण्यात आला आहे. हे प्रमाण सन २०२२ च्या आठ महिन्यांत वाढले असून, बेशिस्त दुचाकीस्वारांपेक्षा विनासीटबेल्ट प्रवास चौपटीने अधिक आहे. यामुळे महामार्गावरील सुरक्षेसह चालकांनी स्वयंशिस्त पाळण्याचे आव्हान यंत्रणेसमोर उभे ठाकले आहे.

वाढत्या रस्ते अपघातांमुळे कारमधील सर्व प्रवाशांना सीटबेल्ट बंधनकारक करण्याचा निर्णय नुकताच केंद्रीय परिवहन मंत्र्यांनी घोषित केला आहे. मात्र, उत्तर महाराष्ट्रात होणारे उल्लंघन हे अतिशय गंभीर असून, पोलिसांच्या कारवाईचा फुगवटा केवळ वाढत आहे. अहमदनगरमध्ये गतवर्षी सुमारे ५८ हजार कारचालकांना १ कोटी ११ लाखांचा दंड झाला. धुळ्यात ३० लाख आणि नाशिक ग्रामीणमध्ये २० लाख चालकांवर कारवाई झाली. यापैकी निम्म्या वाहनचालकांनी अद्याप दंडदेखील भरलेला नाही.

## कैद्याची आत्महत्या, कळंब्यात खळबळ

सुराज्य/कोल्हापूर

अंमली पदार्थ, हाणामारीसह बेकायदा शस्त्रे बाळगणे अशा गंभीर गुन्ह्याचे रेकॉर्ड असलेल्या आणि मोका अंतर्गत कारवाई झालेल्या सांगली जिल्ह्यातील आरोपीने आत्महत्या केली आहे.

कळंबा मध्यवर्ती कारागृहात तो शिक्षा भोगत होता. कैद्याने कापडी पट्टीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. ही घटना आज पहाटेच्या सुमारास घडली. भरत बाळासाहेब घसघसे (वय २९, रा. वाडकर गल्ली, आष्टा, जिल्हा सांगली) असे कैद्याचे नाव आहे. या घटनेने कळंबा कारागृहात एकच खळबळ उडाली आहे.

कोल्हापुरातील कळंबा मध्यवर्ती कारागृहात गंभीर गुन्ह्याखाली आणि मोक्का अंतर्गत कारवाई झालेल्या कैद्याने आज पहाटेच्या सुमारास आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. यामुळे कळंबा कारागृह प्रशासन हादरले.

# दरात वाढ होत नसल्याने साखर उद्योगात चिंता

सुराज्य/कोल्हापूर

यंदाचा ऊस गळीत हंगाम लवकर सुरू होण्याची चिन्हे असतानाच साखर कारखानदारांनी चिंता वाटावी असे चित्र आहे. साखर दरामध्ये वाढ होत नसल्याने साखर कारखानदारांना आतापासूनच चिंता आहे. साखरेचा प्रतिक्विंटल विक्री दर ३६०० करण्याच्या मागणीवर केंद्र शासन निर्णय येत नसल्याने साखर उद्योगात अर्थकोंडीचे भय दाटले आहे.

साखर उद्योगात आर्थिक उत्पन्नाचे अनेक स्त्रोत असताना कारखानदारांची ओरड नाहक असल्याची टीका शेतकरी संघटनांकडून केली जात असल्याने यंदाचाही हंगाम वादाने गाजण्याची शक्यता दिसू लागली आहे. गतवर्षीप्रमाणे ऊस गाळप हंगाम दीर्घकाळ लांबू नये यासाठी हंगाम लवकर सुरू करण्याची तयारी केली असल्याचे सहकारमंत्री अतुल सावे यांनी साखर आयुक्तालयात आढावा येतल्यानंतर स्पष्ट केले होते. यंदाचा राज्यातील ऊस हंगाम १ ऑक्टोबरपासून सुरू (१५ दिवस आधी) सुरू होईल असे दिसते.

गाळपाची तयारी जोरदारपणे सुरू असली तरी आर्थिक समस्यांचे चित्र गंभीर असल्याचे सांगितले जात आहे. आगामी हंगामामध्ये साखर उत्पादन ४०० लाख टनांवर जाईल. त्यातील ४५ लाख टन इथेनॉलसाठी वर्ग होईल असा अंदाज आहे. देशातील साखरेचा खप २७० लाख टन आहे. हमी भाव मिळत असल्याने उसाखालील क्षेत्रांमध्ये वाढ होत आहे. मागणीपेक्षा पुरवठा जादा झाल्याने साखरेचे दर घसरून कारखान्यांना कोटय़वधी रुपयांचा तोटा सहन करावा लागण्याची भीती व्यक्त केली जाते.

### केंद्राच्या निर्णयाकडे लक्ष

केंद्र शासनाने साखरेच्या खर्चावर आधारित साखरेचा किमान विक्री दर निश्चित करण्याचे धोरण जून २०१८ मध्ये जाहीर केले होते. त्यावर्षी साखरेचा किमान विक्री दर प्रति क्विंटल २९०० रुपये होता. तो पुढे ३१०० असा करण्यात आला. एफआरपी मध्ये सन २०२०-२१ व २०२१ -२२ मध्ये अनुक्रमे २,८५० व २,९०० रुपये अशी वाढ झाली. केंद्र शासनाच्या २०१८ मधील अधिसूचने आधारे साखरेचा विक्री दर ३,१०० वरून ३,६०० रुपये प्रति क्विंटल करावा, अशी मागणी केली आहे. निती आयोगाने साखरेचे दर वाढवण्याची शिफारस केंद्र शासनाला केली आहे. आता केंद्रीय मंत्रिमंडळाने हंगाम सुरू होण्यापूर्वी तातडीने निर्णय येतला जावा, अशी अपेक्षा साखर उद्योगातून केली जात आहे.

### कारखाने आर्थिक अडचणीत

साखर विक्री दरवाढ न झाल्यास कारखान्यांना फार मोठय़ा प्रमाणात आर्थिक तोटा सहन करावा लागणार आहे. राज्यातील २०२१-२२ गाळप हंगामातील अद्यापी एफआरपी देय रक्कम १२९१ कोटी रुपये आहे. या हंगामात एकूण गाळप १३२२ लाख टन झाले. एकूण एफआरपी २२६४ कोटी असून त्यातील ३१९७३ कोटी रुपये अदा केले आहेत. कायद्यातील तरतुदी प्रमाणे एफआरपीची रक्कम वेळेत अदा करण्यात आर्थिक अडचणी येत आहेत. तोटा सहन करावा लागत असल्याने कारखान्यांना उणे नक्तमूल्य सह अन्य प्रश्नांना तोंड द्यावे लागत आहे. बँकांकडून पतपुरवठा अडचणी होत आहे. एकूणच परिस्थिती गंभीर होत चालली आहे.

## देशाला हादरवणाऱ्या घटनेचा ११ वर्षांनी निकाल

सुराज्य/मनमाड : अप्पर जिल्हाधिकारी यशवंत सोनवणे जळीत हत्याकांडचा तब्बल अकरा वर्षानंतर निकाल लागला आहे. मालेगाव अप्पर जिल्हा सत्र न्यायलयाने तिन्ही आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला २५ जानेवारी २०११ मध्ये इंधन माफियांनी जिवंत जाळून त्यांची हत्या केली होती. या घटनेतील मुख्य आरोपी पोपट शिंदे याचा आधीच मृत्यू झाला आहे. तर यातील कुणाल शिंदे याच्यावर बालन्यायालयात खटला सुरू आहे. उरलेल्या तिया आरोपींना ३०२ सह विविध कलमांतर्गत जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली आहे. प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंधेला २५ जानेवारी २११ ला अप्पर जिल्हाधिकारी सोनवणे मनमाडपासून जवळ असलेल्या इंधनाच्या अवैध अड्ड्यावर छापा मारण्यासाठी गेले होते. यावेळी इंधन माफियांनी त्यांना जिवंत जाळून त्यांची हत्या केली होती. या घटनेने केवळ महाराष्ट्रच नव्हे तर देश हादरला होता. या प्रकरणातील मुख्य आरोपी पोपट शिंदे हा होता. यासोबतच मच्छिंद्र सुरवडकर, राजू सिरसाट, अजय सोनवणे आणि कुणाल शिंदे असे पाच आरोपी होते. त्यापैकी पोपट शिंदेचा मृत्यू झाला आहे. तर कुणाल शिंदे हा त्यावेळी अल्पवयीन होता. त्यामुळे त्याच्यावर बाल न्यायलयात खटला सुरू आहे.

## सायरस मिस्त्री यांची कार ताशी १०० किमी वेगात

सुराज्य/मुंबई : टाटा सन्सचे माजी प्रमुख सायरस मिस्त्री यांचं अपघाती निधन झाल्यानंतर मर्सिडीजने पालघर पोलिसांकडे चौकशी अहवाल सोपवला आहे. मर्सिडीजने आपल्या अहवालात दिलेल्या माहितीनुसार, कार ताशी १०० किमी वेगाने धावत होती. तसंच अपघाताच्या पाच सेकंद आधी ब्रेक दाबवण्यात आला होता. प्रादेशिक वाहतूक कार्यालयानेही प्राथमिक तपासाचा अहवाल पोलिसांकडे सोपवला आहे. सायरस मिस्त्री यांचा रविवारी दुपारी डहाणूजवळील चारोटी येथील भीषण अपघातात मृत्यू झाला. सायरस मिस्त्री हे पंडोल कुटुंबियांसह अहमदाबादहून मुंबईकडे मर्सिडीज कारने येताना झालेल्या या अपघातामध्ये मिस्त्रींसहीत त्यांच्यासोबत जहांगीर पंडोल यांचाही मृत्यू झाला. या अपघाताच्या तपासाचे आदेश उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. त्यानंतर अपघाताला कारणीभूत ठरलेल्या मर्सिडीज बेन्झ जीएलसी गाडीतील डेटा चीप ही जर्मनीला पाठवण्यात आली होती.

## खांबाला धडकून जीपचा अपघात; दोघांचा मृत्यू

सुराज्य/सांगली : चालकाचा जीपवरील ताबा सुटल्यानंतर विद्युत खांबाला धडकून झालेल्या अपघातात दोन तरूण ठार झाले तर सहा तरूण जखमी झाले. सांगलीजवळील नांद्रे या गावी मध्यरात्री हा अपघात घडला असून या भीषण अपघातामध्ये जीपचे छत एकीकडे तर इंजिनसह अन्य भाग एकीकडे पडला होता. या अपघातामध्ये श्रेयस दिलीप कर्नाळे आणि अजिंक्य राजाराम चौगुले (दोघेही वय २१) या दोघांचा मृत्यू झाला. तर जीपमधील अन्य सहा जण जखमी झाले. यामध्ये ऋषिकेश यादव (२५), साहिल मुल्ला (२१) अनिकेत चौगुले (२०), अवधूत पाटील (२१), तेजस चौगुले (२१) आणि अन्य एकजण असे सहा जण जखमी झाले. या प्रकरणी सांगली ग्रामीण पोलीस ठाण्यात अपघाताची नोंद करण्यात आली आहे. खटाव (ता. पलूस) या गावातील तरूण बुधवारी मध्यरात्री गावी जीपने (एमएच २२ बी ८२३१) सांगलीहून गावी परतत होते. मध्यरात्री दीड वाजणेच्या सुमारास नांद्रे या गावी आल्यानंतर जीप चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने रस्त्याकडेला असलेल्या लोखंडी विद्युत खांबावर आदळली. यामुळे खांबही वाकला तर जीपचे छत दुसरीकडे जाउन पडले. जीपची खांबाला धडक बसल्यानंतर दर्ग्याच्या भिंतीला धडकली. व काही अंतर फरपटत गेली.

## प्रथम श्रेणी पासधारकांना वातानुकूलित लोकलमधून प्रवास

सुराज्य/मुंबई : पनगरीय रेल्वे मार्गावर धावणाऱ्या वातानुकूलित लोकलकडे सामान्य लोकलमधील प्रथम श्रेणी प्रवाशांचाही ओढा आहे. हे प्रवासी वातानुकूलित लोकलकडे वळावेत यासाठी सामान्य लोकलचा प्रथम श्रेणी पास आणि वातानुकूलित लोकल पासातील फरक भरून प्रवाशांना नवीन पास मिळणार आहे. या आठवड्यात मध्य आणि पश्चिम रेल्वेवर अंमलबजावणी होण्याची शक्यता आहे. डिसेंबर २०१७ मध्ये वातानुकूलित लोकल पश्चिम रेल्वेवर दाखल झाली. त्यानंतर मध्य रेल्वेवरही वातानुकूलित लोकल सेवेत आली. वातानुकूलित लोकलकडे आकर्षित झालेले बहुतांश प्रवासी हे सामान्य लोकलच्या प्रथम श्रेणीचेच प्रवासी अधिक असल्याचेही रेल्वे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे सामान्य लोकलच्या अधिकाधिक प्रथम पासधारकांना आकर्षित करण्यासाठी वातानुकूलित लोकल पास रूपांतरीत करता येणार आहे.पासदरातील फरक भरून पास उपलब्ध होणार आहे. तशी मंजुरीहीरेल्वे बोर्डाने दिली आहे. सध्या सेंटर फॉर रेल्वे इन्फॉर्मेशन सिस्टिम (क्रिस)कडून चाचणी सुरू आहे. ही चाचणी पूर्ण होताच मध्य आणि पश्चिम रेल्वेवर याची अंमलबजावणी होणार आहे. या आठवड्यात ही सेवा सुरू होण्याची शक्यता असल्याचे मध्य रेल्वे मुख्य जनसंपर्क अधिकारी यांनी सांगितले. पासदरातील फरक भरून नवीन पास तिकीट खिडक्या वर मिळेल.

कंबर तलाव

गणपती घाट

तुळजापूर रोड खाण

# श्रीगणेश विसर्जनासाठी महापालिकेची तयारी पूर्ण

## ▪ कृत्रिम कुंडासह मूर्ती संकलन केंद्रही उपलब्ध

✔ सुराज्य/सोलापूर

शहरात शुक्रवारी गणेशाचे विसर्जन होत आहे. यासाठी महापालिकेची तयारी पूर्ण झाली आहे. विविध १२ ठिकाणी कृत्रिम कुंड तयार करण्याचे नियोजन केले आहे तर विविध ८४ ठिकाणी मूर्ती संकलन केंद्र उपलब्ध करण्यात आले आहे.

सोलापूर शहरात शुक्रवारी श्री गणेश विसर्जन होणार आहे. त्यानिमित्ताने महापालिका आयुक्तांनी पर्यावरण पूरक मूर्तीचे शक्यतो घरच्या घरीच विसर्जन करावे, असे आवाहन केले आहे. ज्यांना शक्य नाही अशांसाठी विविध ८४ ठिकाणी मूर्ती संकलन केंद्र ठिकाणी सर्व नागरिकांनी मूर्ती संकलित करावे, तेथून महापालिकेच्या वतीने खाणीपर्यंत नेण्याची आणि विसर्जन करण्याची सोय करण्यात आली आहे, असे स्पष्ट केले आहे. शहरात विविध १२ ठिकाणी कृत्रिम कुंड व्यवस्था करण्यात येत आहे. ८४ ठिकाणी श्री गणेश मूर्ती संकलन केंद्र व्यवस्था केली आहे वाहतुकीसाठी ७० गाड्या तैनात राहणार आहेत तसेच महापालिकेचे ६०० कर्मचारी कार्यरत राहणार आहेत त्याचबरोबर मक्तेदाराकडून एका दिवसासाठी ४०० कामगार उपलब्ध करून येतले आहेत. गरज पडली तर आणखी कामगार येण्यात येणार आहेत. श्री गणेश विसर्जनाच्या निमित्ताने विविध ठिकाणी स्वयंसेवकाची ही गरज भासणार आहे त्यासाठी शहरातील सामाजिक संस्थांनी स्वयंसेवक म्हणून कार्य करण्याकरिता महापालिकेकडे पूर्व नोंदणी करावी असे आवाहन महापालिका आयुक्त पी शिवशंकर यांनी होते, त्यालाही चांगला प्रतिसाद मिळाला आहे.

### तुळजापूर रोडवरील खाण येथे अशी आहे व्यवस्था

तुळजापूर रोडवरील खाणीमध्ये संकलित केलेल्या मूर्तीचे विसर्जन करण्याकरिता महापालिकेच्या वतीने नेटकी व्यवस्था करण्यात आली आहे. तुळजापूर रोडवरील या खाण परिसरात लाईटची व्यवस्था करण्यात आली आहे. या ठिकाणी महापालिकेचे ३० कर्मचारी व अधिकाऱ्यांचे पथक दोन शिफ्ट मध्ये तैनात राहणार आहे. सुमारे सात अभियंतेही उपस्थित राहणार आहेत. सकाळी ९ ते ५ व सायंकाळी ५ ते रात्री १२ पर्यंत या दोन शिफ्ट मध्ये कर्मचारी कार्यरत राहणार आहेत. दोन क्रेनची व्यवस्था करण्यात आली आहे. आत आणि बाहेर जाण्याकरिता दोन मार्ग ठेवले आहेत. पोलीस व महापालिका पथकासाठी मंच तयार करण्यात आला आहे. पिण्याच्या पाण्याची ही व्यवस्था करण्यात आली आहे.

### आयुक्तांनी भर पावसात केली पाहणी

सोलापूर शहरात श्री गणेश विसर्जनासाठी महापालिकेची सर्व यंत्रणा सज्ज झाली आहे. या निमित्ताने कृत्रिम कुंड , मूर्ती संकलन केंद्र तसेच मिरवणूक मार्गाची महापालिका आयुक्त पी शिवशंकर यांनी भर पावसात पाहणी केली. निर्माल्य ठेवण्यासाठीची व्यवस्था या संदर्भात आवश्यक त्या सूचना दिल्या. श्री गणेश विसर्जन मिरवणूक मार्गाचीही त्यांनी पाहणी केली.दरम्यान, दत्त चौक, नवी पेठ , पत्रा तालीम यासह विविध मार्गाची त्यांनी पाहणी केली. मार्गावरील रस्ते, लाईटची व्यवस्था याचीही पाहणी करून आवश्यकता सूचना दिल्या. या पाहणीवेळी नगर अभियंता संदीप कारंजे, उपअभियंता एस. एम. आवताडे, कनिष्ठ अभियंता अभिजीत बिराजदार, महादेव इंगळे, किशोर पक्केवाले यांच्यासह महापालिका अधिकारी उपस्थित होते.

### मंडळांनी सहकार्य करावे : आयुक्त

तीन फुटावरील श्री गणेश मूर्तींचे विसर्जन तुळजापूर रोडवरील खाणीत करण्याचे नियोजन आहे तरी विविध मंडळांनी यासाठी महापालिका प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन महापालिका आयुक्त पी शिवशंकर यांनी केले आहे.

### ऐन विसर्जना दिवशी पाणीपुरवठा विस्कळीत

#### नागरिकांमधून संताप

✔ **सोलापूर** : पालिकेच्या उजनी पंप हाऊस आणि टाकळी येथे बुधवारी रात्री पासून विद्युत पुरवठा खंडित झाला आहे. पुरेसा पाण्याचा उपसा होणार नसल्याने शुक्रवार ८ रोजी संपूर्ण शहरातील पाणीपुरवठा विस्कळीत होणार आहे. ऐन गणेश विसर्जनावेळीच पाणीपुरवठा विस्कळीत होणार असल्याने नागरिकांमधून संतापाचे वातावरण आहे.

टाकळी ते अद्यापही विद्युत पुरवठा खंडित आहे. त्याचप्रमाणे पाकणी या ठिकाणी सुध्दा सकाळपासून विद्युत पुरवठा खंडीत आहे. उजनी, पकणी आणि टाकळी याठिकाणी महावितरण कडून विद्युत पुरवठा वारंवार खंडित होत असल्याने त्यामुळे उजनी येथून पुरेसा पाण्याचा उपसा होणार नसल्याने शुक्रवार ८ रोजी संपूर्ण शहरातील पाणीपुरवठा विस्कळीत होणार आहे.पाणीपुरवठा उशिरा, कमी वेळ, कमी दाबाने होणार आहे. नागरिकांनी उपलब्ध पाण्याचा वापर काटकसरीने करावा, असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

## ▪ तीन फूट गणेश मूर्ती विसर्जन

# निर्णय मागे न घेतल्यास मिरवणूक रोखण्याचा इशारा

✔ **सोलापूर** : शासनाचा मिरवणुकीतील मूर्तीबाबत कोणताही आदेश नसताना सोलापूर महापालिका प्रशासन ३ फुटाच्यावरील मूर्ती विसर्जना संबंधात निर्बंध का लादत आहे असा सवाल सोलापूर मध्यवर्ती गणेशोत्सवचे अध्यक्ष अमोल शिंदे यांनी केला आहे.

आम्ही गणेशोत्सव जल्लोषात केला, विसर्जन मिरवणूकही जल्लोषात आहे त्या गणेश मूर्तीसह काढणार आणि विसर्जीत करणार. प्रशासनानं अडवणूक केली तर आमची मिरवणूक थांबवू आणि त्यांच आधी विसर्जन करु असा इशाराही अमोल शिंदे यांनी दिला आहे. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्व उत्सवांवरील निर्बंध उठवले. जल्लोषात उत्सव साजरे करा असे जाहीर केले, मात्र स्थानिक प्रशासन तीन फुट मूर्तीचा मुद्दा उपस्थित करत आहे. ३ हा आकडा आला कोठून उद्या २ फुटाची मूर्ती, हा निर्बंध लावताल. शासनाने असे कोणतं परिपत्रक काढलं आहे का? ते मध्यवर्तीला महापालिका अधिकाऱ्यांनी द्यावं अन्यथा मिरवणुकीत त्यांनी हस्तक्षेप करु नये, असे शिंदे यांनी म्हटले आहे. मध्यवर्तीच्यावतीनं इतर सर्व गणेशोत्सव मंडळांना आवाहन, आहे की, मिरवणूकीत आहे ती मुर्ती घेवून या. ती तीनफुटापेक्षा मोठी असली तरी पालिकेनं तयार केलेल्या कृत्रिम कुंडातच विसर्जित करायची आहे. प्रशासनाने आडकाठी आणल्यास मिरवणूका थांबवू असा इशाराही शिंदे यांनी दिला आहे.

**... तर त्यांना पर्यायी व्यवस्था करू : आयुक्त**

तीन फुटावरील गणेशोत्सव मूर्ती असलेल्या ज्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना वाहन वाहतूक अडचण असल्याने खाणीपर्यंत येणे शक्य नाही. त्यांच्यासाठी महापालिकेच्या वतीने तेथील मूर्ती संकलन करून तुळजापूर रोडवरील खाण येथे आणून विसर्जन करण्याची व्यवस्था करण्यात येईल, असे महापालिका आयुक्त पी शिवशंकर यांनी स्पष्ट केले आहे.

# मंगळवेढा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जबरी चोरी उघडकीस

✔ **सोलापूर** : मंगळवेढा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जबरी चोरी उघडकीस आणून ५० हजार रुपये किमतीचे सोन्याचे गंठण जप्त करून आरोपीला अटक करण्यात आली आहे.संभाजी शिवाजी भोसले (वय-२५,रा.मुळेगाव पारधी कॅम्प, सोलापूर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

लक्ष्मी मुरलीधर शेजाळ (वय-७२,रा. नंदेश्वर ता. मंगळवेढा) या नंदेश्वर येथे जाण्यासाठी सांगोला नाका येथे थांबल्या होत्या.त्यावेळी एक चार चाकी गाडी जवळ येत त्यांना गाडीत बसा, असे चालकांनी सांगितले. त्याच दरम्यान चालकाने शेजाळ यांना चाकू दाखवून सोने काढून देण्याची मागणी केली. याबाबत मंगळवेढा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता.त्यावेळी मंगळवेढा पोलिसांनी आरोपी भोसले याला ताब्यात येत अटक करून चौकशी केली असता, त्याने गुन्हा केल्याची कबुली दिली. ही कामगिरी पोलीस अधिक्षक तेजस्वी सातपुते, सोलापूर ग्रामीण, अप्पर पोलीस अधिक्षक हिंमत जाधव, राजश्री पाटील उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रणजित माने मंगळवेढा पोलीस ठाणे, स.पो.नि बापुराव पिंगळे, पो.हे.कॉ.दयानंद हेबाडे, पोकॉ. वैभव घायाळ यांनी या गुन्ह्याचे तपास कामी मदत केली आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास स.पो.नि बापुराव पिंगळे, मंगळवेढा पोलीस ठाणे हे करीत आहेत.

# चोरट्याने दागिन्यांसह रक्कम पळवली

✔ सुराज्य/सोलापूर

चोरट्याने दागिन्यांसह रोख रक्कम चोरून नेल्याची घटना ६ सप्टेंबर रोजी पहाटे सहा वाजण्याच्या दरम्यान अंबिका नगर अक्कलकोट रोड येथे घडली. याप्रकरणी राजशेखर बसवराज कारंडे (वय-३५, रा.अंबिका नगर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

त्यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल झाला आहे. राजशेखर कारंडे यांच्या किचनच्या उघड्या दरवाज्यातून चोरट्याने घरात प्रवेश केला त्यानंतर देवघरात असलेल्या लोखंडी कपाटाचा दरवाजा उघडून त्यामधील सोन्या-चांदीच्या दागिन्यांसह रोख रक्कम मिळून ६६ हजारांचा ऐवज चोरून नेला आहे. पुढील तपास पोह. पाटील करत आहे.

### लॉक केलेली दुचाकी पळवली

✔ **सोलापूर** : चोरट्याने हॅण्डल लॉक करून ठेवलेली एम.एच.१३. सीएच.९८४४ ही दुचाकी चोरून नेली आहे. याप्रकरणी युन्नुस जाकीर हुसेन सुतार (वय-२५, रा. मु.पो. होटगी गाव) यांनी सदर बाजार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

# उत्तर सोलापूर तालुक्यात ६५ मि.लि.पेक्षा जास्त पाऊस

## खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान

✔ **सोलापूर** : सलग दोन दिवसांपासून पडणाऱ्या पावसामुळे जवळपास १२०० ते १३०० एकर वरील खरीप पिकासह फळभाज्या ,फळांची बागेच मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. प्रत्येकाच्या शेतात जाऊन पंचनामे करण्यात येत असल्याचे उत्तरचे कृषी अधिकारी मनिषा मिसाळ यांनी सांगितले आहे.

पूर्वा नक्षत्राच्या पावसाने उत्तर सोलापूर तालुक्याला झोडपून काढले आहे. शेतामध्ये पाणी साठले आहे. साठलेल्या पाण्यामुळे वेल भाजी, फळभाज्या सडून जात आहेत. पडसाळी, कौठाळी, नान्नज येथील फळ गळून पडत आहेत. बागेत पाणी पडल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. नान्नज वडाळा येथील घेवडा, कांदे, पडवळ असे वेल वर्गीयपिके पूर्णपणे पाण्यात आहेत. यासोबतच खरिपातील तूर, मूग, उडीद, सोयाबीन, कांदे, कोथिंबीर अस्त्यां पिकांना फटका बसला आहे. वडाळा, नान्नज,तिऱ्हे मंडळात १६ तास वीज नसल्याने शेतकरी अडचणीत सापडला आहेत अशातच सलग दोन दिवस पडत असलेल्या पावसाने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे.शासनाने त्वरित पंचनामे करून नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी श्रीमंत बंडगर, संजय वायमोडे, विष्णू बंडगर, अमित सिरसट, शिवाजी भोसले यांच्यासह शेतकऱ्यांनी केली आहे.

### नुकसान भरपाई मिळावी म्हणून प्रयत्न : मिसाळ

दोन ते तीन दिवसात उत्तर तालुक्यत वडाळा, मार्डी मंडळात ६२ मी. लि. पेक्षा जास्त पाऊस पडल्याची नोंद झाली आहे. अतिवृष्टीमुळे भाजीपाला, फळे, खरिपातील पिकाचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. कृषी विभागाच्या वतीने पंचनामे करून नुकसानीचे अहवाल वरीष्ठ विभागाला पाठवून लवकर नुकसान भरपाई मिळावी म्हणून प्रयत्न करणार आहे, असे कृषि अधिकारी मनिषा मिसाळ यांनी सांगितले.

# आंदोलनाच्या माध्यमातून दिलीप माने यांचे शहरी भागावर लक्ष केंद्रीत

✔ सुराज्य/अजित उंब्रजकर

आसरा पुलावरील रस्ता डांबरीकरणासह विविध मागण्यांद्वारे माजी आ. दिलीप माने यांनी नुकतेच महापालिकेसमोर एक दिवसीय उपोषण केले, त्यांचे हे उपोषण आणि आंदोलन म्हणजे आगामी विधानसभा निवडणुक डोळ्यासमोर ठेवून शहरी भागात घुसण्याचा प्रयत्न असल्याचे बोलले जात आहे.

सन २००९ ते १४ दरम्यान दिलीप माने यांनी शिवसेना उमेदवार रतिकांत पाटील यांचा पराभव करत दक्षिण तालुक्याचे नेतृत्व केले. मात्र त्यानंतर २०१४ मध्ये भाजप आणि सेनेची युती तुटल्यामुळे दक्षिणमधून येथून सुभाष देशमुख यांना भाजपकडून उमेदवारी देण्यात आली. आ. देशमुख यांनी दिलीप माने यांच्यावर तब्बल २८ हजार मतांनी विजय मिळवला. त्यानंतर २०१९ मध्ये दिलीप माने यांनी शिवसेनेमध्ये प्रवेश केला आणि त्यांनी शहर मध्यमधून निवडणूक लढवली. मात्र तेथे त्यांना सलग दुसरा पराभव पत्करावा लागला. मात्र शहर मध्य मधून उभारणे आपली चूक आहे हे त्यांनी जाहीररित्या कबूल करून पुन्हा आपला मोर्चा दक्षिण विधानसभा मतदारसंघाकडे वळवला. दक्षिण मतदारसंघातून विधानसभा निवडणूक जिंकायची झाल्यास केवळ ग्रामीण भागात लक्ष देऊन चालणार नाही याची जाणीव दिलीप माने यांना झाली आहे. २०१४ आणि २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत आमदार सुभाष देशमुख यांना ग्रामीण भागातून कमी मतदान झाले होते मात्र जसजसे शहराच्या भागाची मतमोजणी सुरू झाले तेथून सुभाष देशमुख यांनी आघाडी येत मोठा विजय मिळवला होता. दक्षिण विधानसभा मतदारसंघात जरी ग्रामीण भाग जास्त असला तरी शहरात सर्वाधिक मतदान आहे हे विसरून चालणार नाही. त्यामुळे शहरात जो उमेदवार जास्त मते घेतो त्या उमेदवाराचा विजय निश्चित मानला जातो. मागच्या दोन्ही विधानसभा निवडणुकीत आमदार सुभाष देशमुख यांना ग्रामीण भागात मते कमी मिळाली होती. २०१९ मध्ये तर आ. सुभाष देशमुख यांच्या विरोधात नवखे उमेदवार बाबा मिस्त्री होते तरीही ग्रामीण मधून आमदार देशमुख यांना मतदान कमी झाले होते. मात्र शहरी भागात संपूर्ण वर्ग भाजपला मानणारा असल्यामुळे साखर कारखान्यापासून ते नीलम नगरपर्यंत जवळपास सर्व बूथवर सुभाष देशमुख यांनी आघाडी घेत दोन्ही वेळेला विजय मिळवला. नेमकी आता हीच बाब ओळखून दिलीप माने यांनीही ग्रामीण बरोबर आता शहरी भागातही लक्ष घालण्यास सुरुवात केली आहे. आसरा पुलावरील रस्ता डांबरीकरणावरून त्यांनी केलेले आंदोलन म्हणजे हा शहरी भागात घुसण्याचा प्रयत्न असल्याचे बोलले जात आहे. सध्या दिलीप माने शिवसेनेत आहे. ते राष्ट्रवादीमध्ये जाणार अशी चर्चा आहे. ते सेनेत राहो अथवा राष्ट्रवादीत जावो ते पुन्हा दक्षिणमधून लढणार हे जवळपास नक्की आहे. त्याच दृष्टीने त्यांनी व्यूहरचना सुरू केली आहे.

## इकडे विहीर लगतच तलाव...

# तांदुळवाडी-खोरेवस्ती रस्ता विद्यार्थ्यांसाठी बनला मौत का कुवॉ

✔ **अकलूज** : माळशिरस तालुक्यातील तांदुळवाडी येथे खोरेवस्ती येथील जिल्हा परिषद शाळेला जाण्यासाठी विद्यार्थ्यांना जीव धोक्यात यालून जावे लागत असून इकडे विहीर व लगतच तलाव असल्याने शिक्षण येण्यासाठी ये जा करीत असताना चिमुकल्या मुलांना यातना सहन करत जीवन मरणाचा संघर्ष करावा लागत आहे.

प्राथमिक शिक्षणावर विद्यार्थ्यांचे जीवन घडत असते. पण हे शिक्षण येणेच तांदळवाडी येथे जीव येणे बनले आहे.या गावातील खोरे वस्ती येथे जिल्हा परिषद शाळेमध्ये शिक्षण येण्यासाठी जाणाऱ्या रस्त्यावरच पाणी साचल्याने शेजारी तळे व विहीर असल्याने अक्षरशः चिमुकल्यांना जीव मुठीत धरून यावे जावे लागत आहे. अनेक वेळा परिसरातील लोकांनी ग्रामपंचायतीचे उंबरठे झिजवले पण पुढाऱ्यांना या प्रश्नाविषयी अद्यापही जाग आलेली दिसत नाही. यामुळे विद्यार्थ्यांना शाळेत पाठवताना पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

अनावधनाने अनुचित प्रकार घडला तर याला जबाबदार धरणार तरी कुणाला हा प्रश्न सध्या लोकांना पडला आहे. यासाठी खोरेवस्ती - तांदुळवाडी रस्ता तात्काळ बनणे गरजेचे आहे. यावर प्रशासनासह गावातील पुढारी लक्ष देतील का हा खरा प्रश्न आहे. तात्काळ हा जीवघेणा रस्ता किमान मुरमीकरण तरी करून देण्यात यावा अशी मागणी यानिमित्ताने जोर धरताना दिसत आहे.